गुरुवार, १५ सप्टेंबर २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक ५८
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

कर्जतमध्ये मुलींचा शारीरिक छळ; मौलानाला अटक/२
पनवेल महानगरपालिकेतर्फे फेरीवाल्यांचे होणार सर्वेक्षण/६
कर्जतमध्ये डेंग्यू रुग्णसंख्येत वाढ; पालिकेकडून सर्व्हे/७

## गोव्यात काँग्रेसला खिंडार; आठ आमदार भाजपमध्ये



**पणजी :** देशात काँग्रेस पक्षाला उभारी देण्यासाठी खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारत जोडो यात्रेला सुरुवात झाली असताना काँग्रेसला गोव्यात जबरदस्त धक्का बसला आहे. गोव्यातील काँग्रेसच्या आठ आमदारांनी बुधवारी (दि. १४) भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. या आमदारांनी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांची भेट घेत भाजपमध्ये प्रवेश केला. गोव्यात काँग्रेसचे ११ आमदार आहेत. त्यापैकी दिगंबर कामत, मायकल लोबो, दियालया लोबो, राजेश फळदेसाई, रदाल्फ फर्नांडिस, अलेक्स सिक्वेरा, केदार नाईक, संकल्प आमोणकर या आठ आमदारांनी 'हाता'ची साथ सोडत भाजपचा झेंडा हाती घेतला आहे. मुख्यमंत्री सावंत यांनी सर्वांचे पक्षात स्वागत केले.

# आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरा

## केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे खारघरमध्ये प्रतिपादन



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : प्रतिनिधी**

कर रूपातील महसूल गळती शोधण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरावी. याकरिता केंद्रीय वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) विभागाच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार असल्याचे प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बुधवारी (दि. १४) खारघर येथे केले. केंद्र शासनाने जीएसटी कर्मचाऱ्यांसाठी खारघरमध्ये नव्याने बांधलेल्या 'जीएसटी परिसर' या निवासी संकुलाचे उद्घाटन ना. सीतारामन यांच्या हस्ते झाले. त्या वेळी त्या बोलत होत्या. या वेळी त्यांनी जीएसटी कर्मचाऱ्यांच्या महसुली संकलनात दरमहा वाढ होण्याच्या कामगिरीचे खास कौतुक केले.

या समारंभास केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी, जीएसटी विभागाचे अशोककुमार मेहता, विवेक चौधरी, पी. के. गुप्ता, संगीता शर्मा, सचिव तरुण बजाज व इतर अधिकारी उपस्थित होते. या वेळी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी महसूल गळती कुठे होत आहे हे शोधण्यासाठी तंत्रज्ञान वापर करण्यास सांगून त्यासाठी प्रशिक्षणाशी संबंधित विषयावर महसूल सचिव आणि सीबीआयसीचे अध्यक्ष यांच्याशी चर्चा करण्यात आली असल्याचे सांगितले. (पान २ वर..)

## 'वेदांता-फॉक्सकॉन'चा प्रकल्प मविआ सरकारमुळे गुजरातमध्ये

### मुख्यमंत्र्यांचे विरोधकांना प्रत्युत्तर

**मुंबई : प्रतिनिधी**

वेदांता समूह आणि फॉक्सकॉन कंपनी यांचा प्रकल्प पूर्वी सत्तेत असणाऱ्या महाविकास आघाडी सरकारमुळे महाराष्ट्रातून गुजरातमध्ये गेला असल्याचे सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांच्या टीकेला उत्तर दिले आहे.

वेदांता समूह आणि 'फॉक्सकॉन'च्या भागीदारीतून एक लाख ६६ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा प्रकल्प महाराष्ट्राऐवजी आता गुजरातमध्ये साकारणार आहे. हे शिंदे-फडणवीस सरकारचे अपयश असल्याची टीका विरोधकांनी केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. १४)



यावर प्रतिक्रिया देत पूर्वी सत्तेत असणाऱ्या महाविकास आघाडी सरकारकडे बोट दाखविले आहे.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, आमच्या शिवसेना-भाजप सरकारला दोनच महिने झाले आहेत. मी मुख्यमंत्री झाल्यानंतर वेदांता समुहाचे मालक अनिल अग्रवाल यांच्याबरोबर बैठक घेतली. या बैठकीत उपमुख्यमंत्री, कंपनीचे प्रमुख संचालक उपस्थित होते. या प्रकल्पासाठी पुण्यातील तळेगावजवळ ११०० एकर जमीन आम्ही देऊ केली होती. सरकार आपल्याला ज्या काही सवलती आहेत त्या निश्चित देईल, असेही कंपनीला सांगण्यात आले होते, पण त्याआधी गेली दोन वर्षे त्यांना ज्या पद्धतीने प्रतिसाद मिळायला हवा होता तो कमी पडला असावा, असे सांगत हा प्रकल्प गुजरातला जाण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी आधीच्या महाविकास आघाडीला जबाबदार धरले आहे.

## महाराष्ट्राला यापेक्षा मोठा प्रकल्प मिळणार -ना. सामंत



**ठाणे :** आता दोन महिन्यांत एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांचे सरकार आले आहे. त्यामुळे वाईट झाले तर सगळे खापर त्यांच्यावर फोडायचे आणि चांगले झाले तर आमच्यामुळे झाले म्हणायचे ही राजकारणातील वाईट प्रवृत्ती वाढीस लागली आहे. याचा मी जाहीरपणे निषेध करतो, असा पलटवार उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केला आहे. त्याचप्रमाणे वेदांता समूह आणि फॉक्सकॉन कंपनीचा प्रकल्प गुजरातला गेला असला तरी यापेक्षा मोठा प्रकल्प आम्ही महाराष्ट्राला देऊ, असे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिल्याचे उद्योगमंत्री ना. सामंत यांनी या वेळी सांगितले.

दोन महिन्यांपूर्वी राज्यात शिंदे-फडणवीस सरकार आल्यानंतर वेदांता कंपनीला आणखी काही जास्तीच्या सवलती देता येतील का याबाबत अनेक बैठका झाल्या. एवढेच नाही तर वेदांताचे प्रमुख अनिल अग्रवाल यांच्याशी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वत: बोलले होते, पण मागच्या सात ते आठ महिन्यांत त्यांना जो अनुभव आला त्यामुळे कदाचित त्यांनी गुजरातला प्रकल्प नेण्याचा निर्णय घेतला असावा, असे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी म्हटले आहे.

उगीच दुसऱ्यांवर खापर फोडण्यापेक्षा राजापूर रिफायनरीचे तुम्ही काय करणार आहात याचे उत्तरदेखील महाराष्ट्राला द्यावे. फक्त टीका करायची आणि रिफायनरीच्या बाबतीत खासदारांना विरोध करायला सांगायचा, दुटप्पीपणा करायचा हे सर्व महाराष्ट्राच्या समोर आहे, असेही ना. सामंत यांनी या वेळी विरोधकांना सुनावले.

## आमदार बच्चू कडू यांना जामीन मंजूर



**मुंबई : प्रतिनिधी**

आंदोलनाच्या केल्याप्रकरणी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी मिळालेले माजी मंत्री व अपक्ष आमदार बच्चू कडू यांना सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.

आमदार कडू म्हणाले की, परीक्षेत उमेदवार मोबाइल वापरायचे. पेपरफुटीची प्रकरणे झाली होती. त्याविरोधात केलेल्या आंदोलनात संघर्ष झाला. त्यातून माझ्यावर कलम ३५३ दाखल झाले, पण या प्रकरणी माझ्यावर गुन्हा कधी दाखल झाला, समन्स कधी बजावले हे कळालेच नाही आणि थेट कोठडी सुनावली, परंतु आता सत्र न्यायालयाने मला जामीन मंजूर केल्याने मी कोर्टाला धन्यवाद देतो.

## मुंबई ट्रान्स हार्बर लिंकच्या कामाची मुख्यमंत्र्यांकडून पाहणी

### रायगड जिल्ह्यात नवीन ग्रोथ सेंटर निर्माण होणार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्पाचे काम ८४ टक्के पूर्ण झाले आहे. पुढील वर्षी डिसेंबरपूर्वी हा प्रकल्प पूर्ण होईल. या माध्यमातून रायगड जिल्ह्याच्या उरण तालुक्यातील चिर्ले तसेच पेण, पोयनाड परिसरात ग्रोथ सेंटर निर्माण करण्यात येणार आहे. लॉजिस्टिक्स पार्क, टाऊनशिप आणि रोजगार निर्मिती या तीन बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार असून त्या माध्यमातून या भागाचा सूनियोजितपणे विकास होईल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. १४) येथे व्यक्त केला.

शिवडी येथून सुरू झालेल्या मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्पाच्या कामाची पाहणी मुख्यमंत्र्यांनी केली. त्यांनी प्रत्यक्ष



सागरी सेतूवर जाऊन कामाचा आढावा घेतला. या वेळी एमएमआरडीएचे महानगर आयुक्त श्रीनिवास यांनी मुख्यमंत्र्यांना कामाबाबत माहिती दिली.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मुंबईला रायगड जिल्ह्याशी थेट जोडणारा हा २२ किमी लांबीचा देशातील सर्वाधिक मोठा पहिला सागरी सेतूमार्ग आहे. (पान २ वर..)

## निवडक

### जम्मू-काश्मीरमध्ये बस दरीत कोसळून १२ जणांचा मृत्यू

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमधील पुंछच्या सवजियान भागात बुधवारी (दि. १४) एक मिनीबस दरीत कोसळली. या अपघातात १२ जणांचा मृत्यू झाला असून २४ जण जखमी झाले आहेत. जखमींना मंडी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जम्मू-काश्मीरचे लेफ्टनंट गव्हर्नर मनोज सिन्हा यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहीर केलीय, तर जखमींना चांगले उपचार देण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत.

### देशातील १२ आदिवासी समुदायांचा अनुसूचित जमातींमध्ये समावेश

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. १४) केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली. या वेळी छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, उत्तर प्रदेशातील १२ आदिवासी समुदायांचा अनुसूचित जामातींमध्ये समावेश करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली.

## मुले चोरणारी टोळी समजून चार साधूंना बेदम मारहाण

### सांगलीतील घटना; सहा आरोपी पोलिसांच्या ताब्यात



**सांगली : प्रतिनिधी**

दोन वर्षांपूर्वी पालघरमध्ये घडलेल्या साधूंच्या हत्याकांडाचे पडसाद अजूनही उमटत आहेत. अशातच आता सांगली जिल्ह्यात जत तालुक्यातील लवंगा गावात मुले चोरणारी टोळी समजून चार साधूंना बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी आतापर्यंत सहा आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून आणखी १० ते १२ आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलीस अधीक्षक दीक्षित गेडाम यांनी दिली.

उत्तर प्रदेशमधील मथुरा येथील चौघे साधू हे कर्नाटकला देवदर्शनासाठी आले होते. त्यानंतर ते विजापूरवरून जत तालुक्यातील लवंगामार्गे पंढरपूरला देवदर्शनासाठी निघाले होते. या साधूंनी गावातील एका मुलाला रस्ता विचारला, मात्र त्या तरुणाला हे साधू म्हणजे मुले चोरणारी टोळी असल्याचा संशय आला आणि त्याने ही माहिती गावकऱ्यांना दिली. याच संशयावरुन ग्रामस्थांनी साधूंना गाडीतून बाहेर काढून बेदम मारहाण केली. त्यांना लाठी-काठी आणि पट्ट्याने जबर मारहाण करण्यात आली. या मारहाणीचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

अखेर पोलिसांनी मध्यस्थी करीत साधूंना जमावाच्या तावडीतून सोडविले. ते कोणतीही मुले चोरणारी टोळी नसून देवदर्शनासाठी पंढरपूरला जात असल्याचे समोर आले आहे. या मारहाणप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## मुंबईत 'ईडी'कडून ४३१ किलो सोने-चांदी जप्त

**मुंबई : प्रतिनिधी**

पारेख ॲल्युमिनेक्स लिमिटेड कंपनीशी संबंधित झालेल्या पैशांच्या अफरातफरप्रकरणी (मनी लॉण्डरिंग) सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) बुधवारी (दि. १४) मुंबईतील रक्षा बुलियन आणि क्लासिक मार्बल्स यांच्या चार ठिकाणी छापे टाकले. या वेळी एकूण ४३१ किलो सोने-चांदी जप्त करण्यात आली. यात ९१.५ किलो सोन्याचा समावेश आहे.

सन २०१८मध्ये पारेख ॲल्युमिनेक्स लि. कंपनीविरुद्ध २२९६ कोटी रुपयांची कर्ज फसवणूक आणि मनी लॉण्डरिंग केल्याचा गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणाच्या तपासादरम्यान रक्षा बुलियन्स आणि क्लासिक मार्बल्स यांच्यात काही आर्थिक व्यवहार समोर आले. त्यानुसार ईडीने बुधवारी दोघांशी संबंधित काही ठिकाणी छापेमारी केली.

## अवजड वाहनांची अनधिकृत पार्किंग हटवा

### आमदार महेश बालदी यांची पोलीस आयुक्तांकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय महामार्ग कार्यालय ते जेएनपीटी पोर्ट तसेच द्रोणागिरी नोड-भेंडखळ बीपीसीएल प्रोजेक्ट सर्व्हिस रोड व मुख्य रस्ता येथे होत असलेल्या अवजड वाहनांची अनधिकृत पार्किंग ताबडतोब हटविण्यात यावी, अशी मागणी उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

आमदार महेश बालदी यांनी निवेदनात म्हटले आहे की, कळंबोली ते उरणकडे जाणाऱ्या रस्त्यावर डी पॉईंट राष्ट्रीय महामार्ग कार्यालय ते जेएनपीटी पोर्ट तसेच द्रोणागिरी नोडमधील सर्व्हिस रोड, भेंडखळ बीपीसीएल सर्व्हिस रस्त्यावर दुतर्फा अवजड वाहने अनधिकृत पार्किंग केली जातात. यामध्ये गॅस सिलिंडर, पेट्रोल,





डिझेल यासारख्या ज्वलनशील पदार्थांचा समावेश असतो. भेंडखळ गावानजीक बीपीसीएल कंपनी आहे. या कंपनीमधून गॅस सिलिंडरची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असते. कंपनीत वाहने पार्क करता येत नसल्यामुळे वाहने रस्त्याच्या दोन्ही बाजूस पार्क केली जात आहेत. परिणामी या वाहनांचे ड्रायव्हर, क्लिनर या गाडीखाली स्टोव्ह पेटवून आपले जेवण शिजवतात. ज्वलनशील पदार्थांच्या गाडीखाली स्टोव्ह पेटवल्याने स्फोट होण्याची दाट शक्यता आहे आणि यामध्ये मोठ्या प्रमाणात आसपासच्या गावांना नुकसान होण्याची भीती आहे.

अनेकदा या परिसरात अपघात होऊन अनेक दुचाकीस्वार जखमी व मृत्युमुखी पडलेले आहेत. त्यामुळे याकडे लक्ष देणे गरजेचे आणि त्यासाठी हे बेकायदेशीर अनधिकृत पार्किंग बंद करून रस्ते मोकळे करावेत, असेही या निवेदनात अधोरेखित करण्यात आले आहे.

## माथेरानच्या मिनीट्रेनला पर्यटकांची पसंती



- पाच महिन्यांत दीड लाख प्रवाशांनी केली सफर
- मध्य रेल्वेच्या तिजोरीत एक कोटीहून अधिक उत्पन्न

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

पर्यटकांचे आकर्षण आणि स्थानिकांसाठी दळणवळणाचे साधन असलेल्या माथेरानच्या मिनीट्रेनमधून एप्रिल ते ऑगस्ट २०२२ या पाच महिन्यांच्या कालावधीत तब्बल दीड लाखाहून अधिक पर्यटकांनी सफर केली असून मध्य रेल्वेला सुमारे एक कोटी रुपयांहून अधिक महसूल मिळाला आहे.

थंड हवेचे ठिकाण असलेल्या माथेरानला बहुसंख्य पर्यटक भेट देत असतात. आटोक्यात आलेला कोरोना संसर्ग आणि लागून आलेल्या सलग सुट्ट्यांमुळे मोठ्या संख्येने पर्यटकांनी माथेरानला जाणे पसंत केले. निसर्गसौंदयाचे दर्शन घडवत डोंगरमाथ्यापर्यंत धावणारी माथेरानची मिनीट्रेन अबालवृद्धांना आकर्षित करीत आली आहे. गेल्या पाच महिन्यांत तब्बल एक लाख ५४ हजारांहून अधिक पर्यटकांनी या मिनी ट्रेनमधून सफर केली. त्यामुळे मध्य रेल्वेला एक कोटी १२ लाख रुपये महसूल मिळाला. त्याचबरोबर एप्रिल-ऑगस्ट या कालावधीत १२ हजार ७४ पार्सलची वाहतूकही करण्यात आली.

सध्या मिनीट्रेनची माथेरान ते अमन लॉज अशी शटल सेवा सुरू आहे. गेल्या वर्षी पावसाळ्यानंतर नेरळ ते अमन लॉज मार्गावर २० किलोमीटरपर्यंत नवीन रूळांचे काम हाती घेण्यात आले असून अपघात होऊ नये यासाठी रूळाच्या बाजूला उपाययोजनाही करण्यात येत आहेत. ही कामे पूर्ण करून नेरळ-माथेरानदरम्यानच्या संपूर्ण मार्गावर येत्या डिसेंबरपासून मिनीट्रेन सेवा सुरू करण्याचा मानस आहे.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याचे रशियात अनावरण

**मॉस्को : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रभूमीचे महान सुपूत्र लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या कार्याचा रशियाकडून गौरव करण्यात आला आहे. रशियाची



राजधानी मॉस्कोमध्ये मार्गारिटा रुडोमिनो ऑल रशिया स्टेट लायब्ररी फॉर फॉरेन लिटरेचर या प्रसिद्ध ग्रंथालय संस्थेकडून साहित्यरत्न साठे यांचा पुतळा, तैलचित्र उभारण्यात आले आहे. त्याचे अनावरण बुधवारी (दि. १४) उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले.

या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलताना म्हटले की, रशियात भारतीय संस्कृती जपल्याचा गर्व वाटत आहे. जे वंचितांचे आवाज होते, शिक्षण नसतानाही पुस्तके, कथा, पोवाडे लिहिले, सामाजिक सुधारणेसाठी प्रयत्न केले, भारतीय स्वातंत्र्य संग्रामामध्ये तसेच गोव्याच्या मुक्तीसंग्रामामध्ये ज्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे त्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा गौरव आज रशियाने केला याचा अतिशय आनंद आहे. त्याचबरोबर मला या लोकार्पण सोहळ्याची संधी दिली याबद्दल आभारी आहे.



# फॉक्सकॉन महाराष्ट्राबाहेर जायला मविआ जबाबदार

## भाजप प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी यांची पत्रकार परिषदेतून टीका



**मुंबई : प्रतिनिधी**

वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्प महाराष्ट्राबाहेर जाण्यास उद्धव ठाकरे यांच्या महाविकास आघाडीने स्वीकारलेले धोरणच कारणीभूत असून ठाकरे सरकारच्या काळात या कंपनीसोबत झालेल्या वाटाघाटींचा तपशील जाहीर करा, असे आव्हान भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी यांनी बुधवारी (दि. १४) दिले. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत भांडारी बोलत होते. प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रवक्ते गणेश हाके आदी या वेळी उपस्थित होते.

शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका महाराष्ट्रात उद्योग येऊ नयेत अशीच राहिली आहे. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना टाटांचा नॅनो प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेला, असेही भांडारी यांनी नमूद केले. आघाडी सरकारमधील पक्षांचे कार्यकर्ते खंडणी वसुली करीत असल्याची तक्रार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी तेव्हाचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली होती, याची आठवण करून देत भांडारी म्हणाले की, वेदान्ता-फॉक्सकॉन कंपनीसोबत चर्चा करण्याऐवजी वाटाघाटीसाठीच ठाकरे सरकारचा पाठपुरावा सुरू झाल्यामुळे हा प्रकल्प गुंडाळण्याखेरीज या कंपनीला पर्यायच राहिला नसावा. फडणवीस सरकारच्या काळात गुंतवणुकीसाठी अव्वल असलेल्या महाराष्ट्रातून गाशा गुंडाळायला मविआ सरकारने भाग पाडल्याने गुंतवणुकीला मोठा फटका बसला असून पुन्हा महाराष्ट्राचे अव्वल स्थान मागे पडले, आणि महाराष्ट्राची जागा कर्नाटकने घेतली. मविआ सरकारच्या वसुली धोरणाचा महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्राने धसका घेतला, असेही ते म्हणाले. राज्यातील प्रत्येक विकास प्रकल्पास विरोध करून वसुली आणि तोडपाणी करण्याचे तंत्र महाराष्ट्राला नवे नाही, असा टोलाही त्यांनी मारला.

गेल्या अडीच वर्षांतील धोरण लकवा आणि वसुलीच्या तगाद्याला कंटाळून अनेक गुंतवणुकदारांनी तसेच उद्योगांनी महाराष्ट्राकडे पाठ फिरविली असून मविआ सरकारच्या धोरणामुळे महाराष्ट्र उद्योगस्नेही राहिला नाही, अशी टीकाही त्यांनी केली.

ठाकरे सरकारच्या काळात ओलाचा प्रकल्प अधांतरी राहिला, टेस्लाने पाठ फिरविली, एमआयडीसीमधील किती उद्योग ठाकरे सरकारच्या काळात बंद पडले, यावर संशोधन करायला हवे. दोन महिन्यांपूर्वी सत्तेवर आलेल्या शिंदे सरकारवर आगपाखड करून आपल्या पापावर पांघरुण घालणाऱ्या मविआने महाराष्ट्राची माफी मागितली पाहिजे, अशी मागणी भांडारी यांनी केली.

## रोह्यात गुरे चोरणारी टोळी थोडक्यात निसटली

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा-नागोठणे मार्गावर पोलीस गस्त घालत असताना गुरे चोरी करणारी टोळी निदर्शनास येताच पोलिसांनी त्यांचा पाठलाग केला. हा संपूर्ण थरार मंगळवारी (दि. १३) मध्यरात्री घडला. आरोपीने पोलिसांच्या गाडीलाही ठोकर दिली, परंतु पाऊस आणि अंधाराचा फायदा घेत चोरटे जंगलात फरार झाले.

रोहा-नागोठणे मार्गावर पोलीस नाईक वाहनचालक रघुनाथ केंद्रे, उपविभागीय अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी व पोलीस नाईक भोईर मंगळवारी रात्री गस्त घालत असताना त्यांना पिकअप गाडीत काही जण गुरे चोरीचे साहित्य गाडीत भरत असताना आढळले. पोलिसांनी जवळ जाऊन पाहिले असता, सहा जणांनी गळ्यात फास अडकवलेल्या गाईंना तिथेच सोडून पिकअप घेऊन पळ काढला. पोलिसांनी पाठलाग केला. पीकपवरील आरोपी चालकाने दोन वेळा पोलिसांच्या वाहनाला जोराने धडक मारली. त्यानंतर सानेगाव फाटा येथे जेसीबी रस्त्यावर आडवा असल्याने पिकअप रस्त्यात सोडून आरोपी जंगलाकडे पळून गेले. पोलिसांनी गाडी ताब्यात घेतली आहे. यासंबंधी रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सिडको प्रदर्शनी केंद्रातील 'बॉयलर इंडिया'चे उद्घाटन

**नवी मुंबई : बातमीदार**

शासनाच्या बाष्पके संचालनालयाच्या वतीने आयोजित जागतिक स्तरावरील बॉयरल इंडिया २०२२ प्रदर्शन, चर्चासत्र व कार्यशाळेचे उद्घाटन बुधवारी (दि. १४) उद्योगमंत्री उदय सामंत आणि कामगार मंत्री तथा परिषदेचे स्वागताध्यक्ष सुरेश खाडे यांच्या हस्ते झाले.

राज्यात उद्योगासाठी पूरक वातावरण असून उद्योगांना लागणाऱ्या सर्व सुविधा व प्रोत्साहनपर पॅकेज राज्य शासन देईल, असे प्रतिपादन उद्योगमंत्री सामंत यांनी या वेळी केले. या वेळी आमदार निरंजन डावखरे, आमदार महेश बालदी, आमदार रमेश पाटील, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंघल, विभागीय आयुक्त तथा रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, कामगार आयुक्त सुरेश जाधव, बाष्पके संचालनालयाचे संचालक धवल अंतापूरकर, अदानी पॉवरचे थर्मल हेड चैतन्य प्रसाद साहू, थायसन ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक विवेक भाटिया आदी उपस्थित होते. प्रदर्शनात जर्मनी, स्विझरलँड, इंग्लंड या देशासह दहा देशातील सुमारे २८० उद्योजकांनी या प्रदर्शनात सहभाग नोंदविला आहे. बॉयलर संबंधित विविध यंत्रे, साहित्याची मांडणी येथे आहे. याशिवाय नवनवीन तंत्रज्ञान, घडामोडी यांची माहिती होण्यासाठी चर्चासत्र व परिसंवादाचे आयोजन तीन दिवस चालणार आहे.



### कामगारांचे योगदान महत्त्वाचे

–कामगारमंत्री सुरेश खाडे

**कामगार मंत्री खाडे म्हणाले की, उद्योग क्षेत्रात राज्य अग्रेसर ठेवण्यासाठी कामगार विभाग योगदान देत असून उद्योगांना सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. उद्योग उभारण्यासाठी परवान्यांची सुलभता, कामगारांची सुरक्षितता व कामगार हित या त्रिसुत्रीची अंमलबजावणी राज्यात प्रभावीपणे सुरू आहे. बॉयलर क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञान विकसित होऊन पर्यावरणपूरक वातावरण निर्मितीमध्ये हातभार लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**

## कर्जतमध्ये मुलीचा शारीरिक छळ; मौलानाला अटक

**कर्जत : बातमीदार**




बोहरी धर्मियांच्या मशिदीमध्ये कुराण पठण शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर तेथील मौलानाकडून शारीरिक छळ सुरू आहे. याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात अल्पवयीन मुलीच्या तक्रारीनंतर त्या शिक्षक मौलानावर पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

कर्जत पोलीस ठाणे हद्दीत बोहरी मशिद येथे बोहरी समाजाच्या धार्मिकस्थळाच्या ऑफिसमध्ये विद्यार्थ्यांना कुराण पठण शिक्षण दिले जाते. त्या ठिकाणी गेल्या चार महिन्यांपासून शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या अल्पवयीन मुलीला मौलानाने १२ सप्टेंबर रोजी जवळ बोलावले. त्या मुलीला तिच्या आईने शिकविल्याप्रमाणे शिक्षक मौलाना आपल्या शरीराला 'बॅड टच' करीत असल्याची जाणीव झाली. मुलीने मौलानाला पुन्हा 'बॅड टच' करू नये असे बोलून आपल्या घरी गेली. तिने घडलेला प्रकार आपल्या आईला सांगितल्यानंतर त्या मुलीच्या आई-वडिलांनी कर्जत पोलीस ठाणे गाठले आणि मौलानाविरोधात तक्रार दाखल केली. पोलिसांनी लहान मुलीचा शारीरिक छळ आणि अत्याचार करणाऱ्या शिक्षक मौलानाला अटक केली आहे.

पान १ वरून

### आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरा

लवकरच अधिकाऱ्यांना देशाच्या विविध भागांमध्ये प्रशिक्षण दिले जाईल, जेणेकरून त्यांना महसूल गळती बंद करण्यात मदत करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यास सोयीस्कर वाटेल. या प्रशिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा डीपडाईव्ह, आयओटी (इंटरनेट ऑफ थिंग्ज) यांचा अधिक चांगला वापर करण्यावर भर दिला जाईल, असेही त्या म्हणाल्या.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंत्रिपरिषदेच्या बैठकीत अर्थव्यवस्था कशी सुस्थितीत आहे याचा आणि जीएसटी संकलनातील वाढलेल्या आकड्यांबद्दलही उल्लेख केला होता, असे ना. सीताराम यांनी नमूद केले.

ना. सीतारामन यांच्या हस्ते काही कर्मचाऱ्यांना प्रातिनिधिक सदनिकांच्या वाटप करण्यात आले. या वेळी देण्यात येणाऱ्या चावीच्या प्रतिकृतीवर अर्थमंत्र्यांचे छायाचित्र होते. त्यांनी कर्मचाऱ्यांना चावी देताना प्लेन बाजू पुढे केली व यापुढे माझे छायाचित्र न लावता ज्या कर्मचाऱ्याला सदनिका दिली जाईल त्याचे छायाचित्र त्यावर लावल्यास तो क्षण अविस्मरणीय होईल, असे म्हटले.

केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी जीएसटी कर्मचाऱ्यांसाठी अशा प्रकारचे प्रोजेक्ट देशात उपलब्ध करून दिल्यास महसूल वाढून देशाची अर्थव्यवस्था बळकट होईल, असे म्हटले.

### मुंबई ट्रान्स हार्बर लिंकच्या कामाची मुख्यमंत्र्यांकडून पाहणी

या सागरी सेतूवरून दिवसाला किमान एक लाख वाहनांची ये-जा करण्याची क्षमता असून नागरिकांच्या वेळेची तसेच इंधनाची मोठी बचत होईल. प्रदूषणविरहित असा हा प्रकल्प असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. त्याचे काम करताना पर्यावरणासोबतच फ्लेमिंगोंचीदेखील काळजी घेण्यात आली असून गेल्या वर्षीपेक्षा यंदा जास्त फ्लेमिंगो आल्याचे त्यांनी सांगितले. या सागरी सेतूमुळे मुंबई ते रायगड जिल्ह्यातील चिर्ले हे अंतर केवळ १५ ते २० मिनिटांत पार करणे शक्य होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

राज्याच्या सकल उत्पन्नात सर्वाधिक वाटा मुंबई महानगर क्षेत्रातून येत असून या भागातील नागरिकांना हा प्रकल्प फायदेशीर ठरणार आहे, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक हा चिर्ले गावाजवळून मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला जोडण्यात येणार आहे. त्याचबरोबर हा प्रकल्प ईस्टर्न फ्री वेला जोडला जाणार असल्याने थेट रायगडच्या दिशेने प्रवास करणे शक्य होणार आहे. शिवाय मुंबई-वरळी कोस्टल रोडदेखील शिवडी वरळी कनेक्टरमार्गे हा प्रकल्प जोडण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिली.

**नमुना एन. डी.**

(नियम ९२(३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH 06 AS 3924 चे मालक **श्री. उमेश प्रभाकर पटवर्धन** यांचे तारीख २१/०४/२०२१ रोजी निधन झालेले आहे. मी श्रीमती अंजली उमेश पटवर्धन, पत्ता- ई-६,१-४, वाशी नगर अपना बाजार समोर सेक्टर नं ०१, नवी मुंबई वाशी पिन- ४००७०३.

उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - अंजली उमेश पटवर्धन**
पत्ता- ई-६,१-४, वाशी नगर अपना
बाजार समोर सेक्टर नं ०१, नवी मुंबई
वाशी पिन- ४००७०३

**PANVEL MUNICIPAL CORPORATION**
**TENDER NOTICE**

**CITY ENGINEER'S OFFICE (PMAY DEPARTMENT)**

**INVITATION OF TENDER FOR THE WORKS OF "CONSTRUCTION OF HOUSING COMPLEX UNDER PRADHANMANTRI AAWAS YOJANA" (PMAY)**

Offers by way of e-tendering (Lump Sum Turn-key Form) are invited by the Commissioner, Panvel Municipal Corporation from experienced contractors in e-tendering system for following works. Contractor shall quote his offer considering all taxes excluding GST.

| Name of work | Estimated cost put to the tender (Rs) | Amount of E.M.D (Rs) | Time limit in Calendar months | Cost of Tender Document |
|---|---|---|---|---|
| 1) Survey, Planning, Designing, Building Construction, Obtaining All Relevant Permissions, Required Completion/ Occupancy Certificate from Concerned Local Authority On Lump-Sum Turnkey Basis for Construction of Affordable Housing Under Pradhan Mantri Awas Yojana (Urban) For Rehab and Free Sale Dwelling Units EWS 649& LIG - 165 with Commercial Component of 89 Shops in Panvel Municipal Corporation (PMC) Area. C.A.No. PMC/CE/ PMAYI 90 / 2022 | 136.09 Crores | 68.05 Lakhs | 36 Months (Including Monsoon) | Rs. 5,000/- + 18% GST Total Rs. 5900/- (Non Refundable) |
| 2) Survey, planning, designing, building construction, obtaining all relevant permissions, required completion/ occupancy certificate from concerned authority on EPC (Lump-sum) for Construction of affordable housing under Pradhan Mantri Awas Yojana (Urban) for Rehab and Free sale dwelling units EWS 1602& commercial component of 87 shops at Patel mohalla & kachhi mohallal within Panvel Municipal Corporation area. C.A.No.PMC/CE/ PMAY/ 91 / 2022 | 266.62 Crores | 133.31 Lakhs | 36 Months (Including Monsoon) | Rs. 5,000/- + 18% GST Total Rs. 5900/- (Non Refundable) |

The details of above works, such as Earnest Money Deposit, Security Deposit, Terms & Conditions of the Tender and Schedule of works, are available on website www.mahatenders.gov.in Tenders for these works are to be submitted by e-tendering system.

Bidders can avail the e-tender document **from 19/09/2022** to **02/11/2022** up to 5.00 PM.

Bidders should submit their offer by way of e-tendering system only. The last dateof Submission by way of e-tendering will be **02/11/2022 up to 5.00 PM.** Commissioner, Panvel Municipal Corporation reserves the right to accept or reject any or all tender without giving any reason thereof.

दिनांक : १४/०९/२०२२

**Sd /-**
**(Kalpita Pimple)**
Dy. Commissioner Panvel
Municipal Corporation,
Panvel – 410 206

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२२/प्र.क्र. २३५/२९१/२०२२

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Extension to E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.Tender fees Rs. 500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No: - 7000024451** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-42/2022-2023.** Extension to RFx e-tender for Supply of Portable Heavy Duty Hydraulic Crimping Machine at EHV Substation Maint. Sub-division Apta under EHV O&M Division Panvel. **Tender amount Rs. 2,45,635/-,EMD amount Rs. 5,000/-.** |
| 2 | Online Downloading the RFx | **15.09.2022, 17:00 Hrs. to 21.09.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 21.09.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **22.09.2022 at 11.00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.

**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV (O&M) DN. PANVEL**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E–TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.Tender fees Rs. 500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000024614** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-45/2022-2023.** RFx e-tender for work of Supply, laying and fixing of additional power cable to 220/ 33/22kV Transformer-1,2 & 3 at 220kV ONGC Panvel Substation under EHV (O&M)Division Panvel. **Tender amount Rs. 9,78,090/-, EMD amount Rs. 9,781/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **15.09.2022, 17:00 Hrs. to 22.09.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 22.09.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **23.09.2022 at 11.00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.

**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV (O&M) DN. PANVEL**





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
गुरुवार, दि. १५ सप्टेंबर २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)
कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स
सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)
१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल
Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

# गौरा गणेश दर्शन





पनवेल : परिसरात विविध ठिकाणी गौरा गणपती विराजमान झाला आहे. महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दक्षराज सामाजिक मित्र मंडळाच्या वतीने प्रतिष्ठापना केलेला करंजाडेचा राजा, कळंबोली येथील मार्केटचा राजा, पारगाव येथील एकता दक्षता मित्र मंडळ व सुयोग पाटील यांच्या बाप्पाचे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, माजी सरपंच सुभाष म्हात्रे आदी उपस्थित होते.



उरण : उद्योजक मननशेठ पटेल यांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या गौरा गणरायाचे आमदार महेश बालदी यांनी दर्शन घेतले. या वेळी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, नगरसेवक राजेश ठाकूर, उद्योजक राजेंद्र पडते, विजयशेठ साठे, अल्पसंख्याक रायगड जिल्हाध्यक्ष जसीन गॅस, हिमांशू पटेल, सुरज ठवले, मनोहर सहतिया, रोहन भोईर, महेश घरत आदी उपस्थित होते.

पनवेल : भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी कुंडेवहाळ येथे अमित वासकर, कोपर येथे रणधीर ठाकूर व शेलघर येथे भरत गणपत भगत यांच्या घरी विराजमान गौरा गणपतींचे दर्शन घेतले. सोबत राकेश, वसंतशेठ पाटील, अनंताशेठ ठाकूर, जीवन भगत व अन्य.








पनवेल : महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती मनोहर म्हात्रे यांना वाढदिवसानिमित्त माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अनिल भगत, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, रोहित जगताप उपस्थित होते.



पनवेल : दैनिक राम प्रहरचे माजी व्यवस्थापक हरिभाऊ भाऊराव देशमुख यांची सून व मनिष हरिभाऊ देशमुख यांच्या पत्नी योगिता मनिष देशमुख यांचे नुकतेच निधन झाले. ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात त्यांच्या शोकसभेचे आयोजन बुधवारी करण्यात आले होते. या शोकसभेला महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत श्रध्दांजली अपर्ण केली.

# पनवेलमध्ये शनिवारी रक्तदान शिबिर

## परेश ठाकूर यांच्या हस्ते बॅनरचे प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अखिल भारतीय तेरापंथ युवक परिषदेच्या वतीने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबरला देशभरात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. त्याअंतर्गत पनवेलमध्येही हे रक्तदान शिबिर रेल्वेस्टेशनजवळ सकाळी ८ ते सायंकाळी ६ दरम्यान राबवले जाणार आहे. त्या पार्श्वभूमीवर या शिबिराच्या बॅनरचे प्रकाशन महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी झाले. दरम्यान, त्यांनी भाजपच्या पनवेल शहर उद्योज आघाडीच्या संयोजक पदी विनोद बाफना यांची निवड झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या.



या वेळी भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, सरचिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहर अध्यक्ष रोहित जगताप, युवा नेते प्रितम म्हात्रे, तेरापंत युवक परिषद अध्यक्ष संजय बाफना, मंत्री रवी बाफना, उपाध्यक्ष सुनिल सुक्लेचा, सहमंत्री प्रमोद डांगी, रक्तदान शिबिराचे संयोजक राकेश काठेड, सहसंयोजक जितेंद्र संचेती, शिव देवडा आदी उपस्थित होते.



पनवेल : ज्येष्ठ पत्रकार संजय कदम यांना वाढदिवसानिमित्त मल्हार नेटवर्कचे मुख्य संपादक देवदास मटाले, मल्हार टीव्हीचे संपादक नितीन कोळी, गणेश धुमाळ, अविनाश डोयरिया, पंकज डावलेकर, विशाल पाटील, योगेश पाटील, चेतन पोपटा, अक्षय शार्दूल, संकेत भोईर, मनीषा हातमोडे यांनी शुभेच्छा दिल्या.

# सीकेटी महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (स्वायत्त) येथे १६ आणि १७ सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियानांतर्गत रसायनशास्त्र विभागातर्फे नॅनो टेक्नॉलॉजी आणि त्याची उपयुक्तता या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात सहभागी प्राध्यापकांना विविध मान्यवरांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या राष्ट्रीय चर्चासत्राच्या उदघाटन सोहळ्या प्रसंगी रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख आणि औद्योगिक आणि अभियांत्रिकी रसायनशास्त्राचे प्राध्यापक, रासायनिक तंत्रज्ञान संस्था मुंबईचे प्रोफेसर भालचंद्र भनगे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर या सोहळ्याचे अध्यक्षस्थान जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर भूषविणार आहेत.

या समारंभाच्या प्रथम दिवशी सरदार पटेल विद्यापीठ गुजरात, भौतिक रसायनशास्त्राचे प्रोफेसर डॉ. सौरभ सोनी, मुंबई विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाचे प्रोफेसर डॉ. विश्वनाथ पाटील हे मार्गदर्शनातून प्रकाश टाकणार आहेत. या समारंभाच्या दुसऱ्या दिवशी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, रसायनशास्त्र विभागाचे प्रोफेसर डॉ. अनिल घुले व प्रोफेसर डॉ. सागर डेलेकर तसेच भाभा ऑटोमिक रिसर्च सेंटर, मुंबईच्या रसायनशास्त्र विभागाच्या वैज्ञानिक अधिकारी, डॉ. जयश्री रामकुमार उपस्थित राहणार आहेत आणि सहभागी प्राध्यापकांना मार्गदर्शन करणार आहेत.

राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोप सोहळ्यावेळी महात्मा फुले महाविद्यालय, पनवेलचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय चर्चासत्र महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात येत असून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. एस. के. पाटील यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे. रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख व ह्या चर्चासत्राचे संयोजक प्रोफेसर डॉ. बी. व्ही. जाधव आणि सहसंयोजक व रुसा समन्वयक डॉ. शैलेश वाजेकर हे चर्चासत्र यशस्वीरित्या होण्यासाठी अथक परिश्रम घेत आहेत.

प्रस्तुत कार्यक्रम यशस्वीरित्या होण्यासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.



नवीन पनवेल : भाजपचे माजी शहराध्यक्ष तथा केशवस्मृती पतसंस्थेचे माजी संचालक दौलत लक्ष्मण देशमुख यांची ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात बुधवारी शोकसभा आयोजित करण्यात आली होती. या वेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दौलत देशमुख यांना श्रद्धांजली वाहिली. सोबत ज्येष्ठ नेते सी. सी. भगत.

# गौरा गणेशोत्सवातही साकारला ‘दिबां’च्या नावाने विमानतळाचा देखावा

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

चिरनेर येथील श्री महागणपती मित्र मंडळ आणि श्री महागणपती महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गौरा गणेश उत्सवात नवी मुंबईतील दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाचा सुंदर असा देखावा साकारला आहे.

मंडळाचे कार्याध्यक्ष मिलिंद ठाकूर व अध्यक्ष सुजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे कार्यकर्ते निलेश ठाकूर, अमर ठाकूर व संकेत ठाकूर तसेच अन्य कार्यकर्त्यांच्या सजावटीतून हा नवी मुंबईतील आगरी कोळी व कराडी या प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीवर होऊ घातलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाचा देखावा साकारण्यात आला आहे.



## अर्थसाक्षर स्पर्धा : ३५

### निकाल पुढीलप्रमाणे

१. येत्या ३० सप्टेंबर २२ पासून कोणत्या कंपनीचा निफ्टी ५० मध्ये समावेश होणार आहे?
ई. अदानी इंटरप्रायजेस

२. पुढीलपैकी कोणत्या देशाचा पहिल्या पाच अर्थव्यवस्थेमध्ये समावेश होत नाही?
इ. फ्रान्स

३. ऑगस्ट २२ मध्ये जीएसटीचे एकूण संकलन किती झाले आहे?
अ. १.४४ लाख कोटी रुपये

अर्थसाक्षर स्पर्धा ३५या प्रश्नांना एकाही स्पर्धकाने बरोबर उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अर्थसाक्षर स्पर्धा ३५साठी एकही विजेता नाही.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३६


**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक असलेल्या डीमॅट खात्यांची संख्या भारतात सध्या एवढी झाली आहे?**
***अ.*** ४.३ कोटी ***आ.*** ५.५ कोटी ***इ.*** १० कोटी ***ई.*** ७.४ कोटी

**२. मोबाईल सेवा पुरविणारी भारतातील सर्वात मोठी कंपनी कोणती आहे?**
***अ.*** जिओ ***आ.*** भारती एअरटेल
***इ.*** व्होडाफोन आयडिया ***ई.*** टाटा टेलिकम्युनिकेशन

**३. भारतीय शेअर बाजारात सर्वाधिक बाजारमूल्य असलेली बँक कोणती?**
***अ.*** एचडीएफसी बँक ***आ.*** आयसीआयसीआय बँक
***इ.*** कोटक महिंद्रा बँक ***ई.*** स्टेट बँक ऑफ इंडिया




**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई–स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# उलट्या बोंबांचे भोंगे

वेदांता समूह आणि फॉक्सकॉन या बलाढ्य कंपन्यांनी संयुक्तपणे सेमीकंडक्टर निर्मितीचा कारखाना गुजरातमध्ये उभारण्यात येत असल्याची घोषणा केल्यानंतर महाराष्ट्रात राजकीय रणकंदन माजले आहे. या रणकंदनाचा सर्वच भाग निव्वळ राजकीय असल्याने वस्तुस्थितीपेक्षा आरोप-प्रत्यारोपांनाच महत्त्व मिळताना दिसते आहे.

वेदांता-फॉक्सकॉनचा हा प्रकल्प महाराष्ट्रात येऊ घातला होता. तशा प्रकारची हवादेखील निर्माण करण्यात आली होती, परंतु प्रत्यक्षात गुजरातने बाजी मारली आणि महाराष्ट्राच्या तोंडचा घास पळवला. राज्याला संजीवनी देणारा प्रकल्प म्हणून त्याकडे पाहिले जात होते. तब्बल एक लाख ५४ हजार कोटींचा हा प्रकल्प राज्याच्या आर्थिक वाढीसाठी नक्कीच हातभार लावणारा ठरला असता. केवळ वस्तूसेवा करापोटी काही हजार कोटी रूपये सरकारी तिजोरीत नियमित पडले असते. सेमीकंडक्टर निर्मितीच्या क्षेत्रात भारताचे स्थान नगण्य आहे. मोबाइल फोनपासून टीव्ही, संगणक आदी सर्वच इलेक्ट्रॉनिक वस्तूंपर्यंत सेमीकंडक्टर अनिवार्य असतो. किंबहुना, ही मायक्रोचिप कुठल्याही इलेक्ट्रॉनिक वस्तूचा प्राणच असते. कोरोना काळानंतर जगभरात सेमीकंडक्टरचा तुटवडा जाणवतो आहे. अशा परिस्थितीत भारतातच सेमीकंडक्टर निर्मितीच्या महाप्रकल्पाला मुहूर्त लाभत आहे ही बाब निश्चितच स्वागतार्ह मानायला हवी. तथापि, हा प्रकल्प महाराष्ट्रात येणार हे 'ऑलमोस्ट फायनल' झाले होते हा महाविकास आघाडीच्या नेत्यांचा दावा हास्यास्पद ठरतो. कारण व्यवसायाच्या क्षेत्रात थोडेसे फायनल, बरेचसे फायनल, जवळपास फायनल असला काही प्रकार नसतो. सचिवालयातील काही अधिकारी आणि नकारात्मक मानसिकता असलेले काही नेते यांना सोबत घेऊन एकमेकांमध्येच बैठका घेतल्यामुळे परकीय गुंतवणूक येत नाही. त्यासाठी व्यावसायिक दृष्टिकोनातून चोख वाटाघाटी कराव्या लागतात हे महाविकास आघाडी सरकारच्या गावीही नव्हते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गणरायाच्या दर्शनात मग्न होते, त्या काळात प्रकल्प हातातून निसटला, असा आरोप माजी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी केला. तो बालिशपणाचा आहे. वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी समांतरपणे गुजरात, तेलंगण आणि तामिळनाडू या राज्यांशी प्राथमिक बोलणी सुरू ठेवली होती. गुजरात सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिल्यामुळेच प्रकल्प तेथे गेला. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे सेमीकंडक्टर निर्मितीच्या संदर्भात रीतसर धोरण आखणारे गुजरात हे पहिले आणि एकमेव राज्य आहे. सेमीकंडक्टर निर्मिती क्षेत्रामध्ये गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांना किंवा संस्थांना सवलती देणारे हे धोरण यंदाच्या वर्षीच गुजरात विधानसभेने मंजूर केले. सेमीकंडक्टर निर्मितीसाठी अर्थसंकल्पीय तरतूद करणारे गुजरात हेच एकमेव राज्य आहे. अहमदाबादजवळील ढोलेरा येथे सेमीकॉन पार्क हे पूर्णत: सेमीकंडक्टर निर्मितीसाठी विकसित करण्यात येणारे क्षेत्र आहे. साहजिकच वेदांता-फॉक्सकॉनने महाराष्ट्रापेक्षा गुजरातची निवड केली यात नवल काहीच नाही. गुंतवणूक आकर्षित करून घेण्यासाठी जी व्यावसायिक जागरूकता लागते, त्याची महाराष्ट्रात वानवाच आहे. महाविकास आघाडी सरकारची अडीच वर्षे तर फक्त खुर्ची-बचाव मोहिमेतच वाया गेली. ठाकरे सरकारला मोठ्या प्रकल्पांबद्दल किती उत्साह होता हे नाणार प्रकल्पावरून दिसून आलेच. कोकणातील रिफायनरी प्रकल्पाच्या कामात खोडा घालण्याचे काम तेवढे ठाकरे समर्थकांनी चोखपणे पार पाडले. महाराष्ट्रात येऊ घातलेला रिफायनरीचा प्रकल्प आजही उभा राहू शकलेला नाही. एकंदरीत अशा प्रकल्पांबाबत ठाकरे समर्थक आणि एकंदरच महाविकास आघाडीचा इतिहास फारसा चांगला नाही. उलट्या बोंबा मारण्यापेक्षा जनहिताच्या प्रश्नांकडे विरोधकांनी लक्ष द्यावे हेच त्यांच्याही हिताचे आहे.

# विकासकामांतील स्टीलचोरीच्या घटनांमध्ये वाढ



### खबरबात
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यात चौपदरीकरणासोबतच विविध विकासकामांची रेलचेल सुरू आहे. असे असले तरीदेखील या विकासकामांसाठी वापरण्यात येणाऱ्या सामानाच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे कारण विविध कामांसाठी वापरण्यात येणारे सामान हे त्याच ठिकाणी उघड्यावर ठेवले जाते. त्यामुळे या सामान चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. अनेक चोरीच्या घटनांबाबत पोलीस स्थानकात तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत, मात्र तक्रार दाखल केल्यानंतर पुढे तपासाबाबत कोणतीही विशेष हालचाल झालेली नाही. त्यामुळे याबाबत पोलीस प्रशासनासह विकसकांनीही तेवढ्याच गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

पोलादपूर तालुक्यातील रस्त्यालगतचे क्रॅश बॅरियर्स तसेच अन्य लोखंडी सामान गायब होण्याचे प्रकार गेल्या काही दिवसांपासून सर्रासपणे सुरू आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील जुन्या रस्त्यालगतचे खांब काढून बाजूला ठेवून नवीन रस्त्यालगत विजेचे पर्यायी खांब उभारण्यात आले असताना, त्या खांबांची वेळीच दिवील रस्त्यावरील तुर्भे सबस्टेशनच्या आवारात वाहतूक न झाल्याने चोरीला जाण्याचा प्रकार वाढला आहे. त्यामुळे याबाबत विकसकांनीही तत्परता दाखविणे गरजेचे आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरून गेल्या काही महिन्यांपासून ट्रक्स, कंटेनर्समधून काही प्रमाणात स्टील परस्पर संगनमताने काढणे, जुने विजेचे खांब कापून त्यांची वाहतूक करणे, दरीलगतचे क्रॅश बॅरियर्स दरीत ढकलून त्याची परस्पर वाहतूक करून विक्री करणे अथवा त्याच क्रॅश बॅरियर्सना रंग लावून ठेकेदाराला नवीन क्रॅश बॅरियर म्हणून विकणे आदी प्रकारांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे अशा चोरीच्या घटना रोखण्यासाठी काय उपाययोजना करता येतील, याकडे गांभिर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटाला पर्यायी भुयारी राष्ट्रीय महामार्गाच्या कामातील बांधकाम साहित्याची चोरी होत असल्याचा संशय तेथील पोटठेकेदार असलेल्या एसडीपीएल कंपनीला आला होता. त्यांनी तातडीने याबाबत पोलादपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांच्या गुप्तवार्ता विभागाने काढलेल्या माहितीवरून, एका अज्ञात आरोपीने गुरांच्या गोठ्यामध्ये हे चोरून आणलेले स्टील लपवून ठेवल्याचे आढळून आले. गुप्तवार्ता विभागाने या बांधकाम साहित्याच्या चोरीवर बारकाईने लक्ष ठेवले असता या गोठ्यामध्ये अंदाजे ३६ हजार रूपये किमतीचे ठेवलेले साहित्य हस्तगत केले.

पार्टेकोंड ते सावंतकोंड दरम्यानचा एक लोखंडी पूल काही दिवसांपूर्वी चोरीला गेल्याची तक्रार नगरपंचायत पोलादपूरकडून पोलादपूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. तक्रार दाखल झाल्यानंतर रात्रीच्या अंधारात काही अज्ञातांनी याच ठिकाणी पुलाचे अवशेष आणून टाकले. त्यामुळे आरोपीला अटक करण्याऐवजी मुद्देमाल छिन्नविछिन्न स्वरूपात घटनास्थळी पुन्हा हजर झाल्याने अज्ञात आरोपीविरोधात कायदेशीर कारवाई होण्याऐवजी त्याचा बचाव करण्यासाठी झालेल्या प्रयत्न होत असल्याचा आरोप सध्या जागरूक नागरिकांमधून करण्यात येत आहे.

पोलादपूर नगरपंचायतीच्या ताब्यातील सावंतकोंड, पार्टेकोंड प्रभाग क्रमांक १मध्ये नळ पाणीपुरवठा करण्याची पाईपलाइन चोरीला गेल्याची तक्रार अमोल भुवड यांनी पोलादपूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी महादेव रोडगे यांच्याकडे दिली आहे. यापूर्वी याच ठिकाणी असलेल्या लोखंडी पुलाची चोरी झाल्यानंतर एफआयआर दाखल होताच पुलाचे तुकडे पुन्हा घटनास्थळी आढळून आले होते. अमोल भुवड यांनी त्या घटनेसंदर्भातील आरोपी अटक करण्यासाठी उपोषणाचा इशारा दिला असताना पुन्हा चोरीची घटना झाल्याने शहरामध्ये खळबळ उडाली आहे.

पोलादपूर तालुक्यात भंगार माफियांनी अनेक विकासकामे खोदून चोरल्याच्या घटना गेल्या वर्षभरात झाल्या असून त्याकडे सपशेल दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांमधून करण्यात येत आहे. पोलादपूर नगरपंचायतीच्या हद्दीतील प्रभाग क्रमांक १मध्ये दोन महिन्यांपूर्वी एक लोखंडी पूल कापून चोरून नेण्याची घटना पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाल्याने चर्चेत आली होती, मात्र गुन्हा दाखल होऊन आरोपी पकडण्याआधीच तुकडे तुकडे केलेला लोखंडी पूल घटनास्थळी अज्ञात व्यक्तींनी आणून ठेवल्याने याबाबत कोणताही तपास झाला नाही. या घटनेबाबत सर्वश्रुत आरोपींची चर्चा पोलादपूर शहरात होत असताना आता याच सावंतकोंड पार्टेकोंड परिसरातील नागरिकांना नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी टाकण्यात आलेली भूमिगत पाईपलाइन ग्रामस्थांना समजून आले. त्यामुळे अ‍ॅड. सचिन गायकवाड, नगरसेवक स्वप्नील भुवड आणि अमोल भुवड यांनी मुख्याधिकारी महादेव रोडगे यांना या प्रकरणी पोलीस तपास होऊन कारवाई होण्याकामी एफआयआर दाखल करण्यासाठी निवेदन दिले.


पोलादपूर तालुक्यात अनेक ठिकाणी रस्त्यालगतच्या रेलिंगचे कठडे, पुलाचे कठडे, लोखंडी पूल, स्मशानाचे आयबीम लोखंडी खांब, वादळामुळे कोसळलेले विजेचे लोखंडी खांब आदी विकासकामांशी निगडीत वस्तूंची भंगार माफियांनी सर्रास चोरी करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून याबाबत प्रशासनाकडून फारसे गांभिर्याने घेतले जात नसल्याने चोरांची उदयास आलेली नवी टोळी तालुक्यात चर्चेचा विषय ठरत आहे. याखेरीज पोलादपूर तालुक्यातील स्मशानशेड तसेच अन्य लोखंडी साकव, रस्त्यालगतचे लोखंडी पूल आणि नळयोजनांच्या पाईपलाइनची चोरी वेळोवेळी झाल्याचे उघड झाले असूनही सर्वच प्रकरणांचा अद्यापही तपास सुरू आहे. त्यामुळे आता विकासकामांमध्ये वापरल्या जाणाऱ्या वस्तूंच्या सुरक्षेबाबतही कोणतीही ठोस उपाययोजना नसल्याने चोरीच्या घटना अशाच घडत राहतील असे नागरिकांमधून बोलले जात आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# 'या' ट्रिक्स वापरून करा स्पॅम ई-मेलपासून सुटका

आज जगभरात १५० कोटींहून अधिक लोक ई-मेल पाठवण्यासाठी जीमेलचा वापर करतात. वैयक्तिक असो किंवा व्यावसायिक ई-मेल पाठवण्यासाठी लोकांनी जी-मेललाच प्राधान्य द्यायला सुरुवात केली आहे. यासोबतच जी-मेलवर हॅकर्सही मोठ्या प्रमाणात दिसत आहेत आणि त्यामुळे ऑनलाइन फसवणुकीची प्रकरणे समोर येऊ लागली आहेत. हे हॅकर्स स्पॅम ई-मेल आणि फिशिंग संकेतस्थळाच्या माध्यमातून जीमेलचा डेटा हॅक करतात. यासाठी फॉलो करा पुढील ट्रिक्स...




ई-मेलला अनसबस्क्राइब करा : तुम्ही तुमच्या वापरात नसलेल्या किंवा तुम्हाला उपयोगी नसलेल्या ईमेलला अनसबस्क्राइब करू शकता. हे तुम्हाला निरुपयोगी आणि अवास्तव ई-मेल प्राप्त करण्यापासून थांबवेल. ईमेलचे सदस्यत्व रद्द करण्यासाठी, स्पॅम ई-मेल निवडा आणि त्यानंतर तुम्हाला डिलीटच्या बाजूला एक पर्याय मिळेल, तो म्हणजे रिपोर्ट स्पॅम आणि अनसबस्क्राइब, तुम्ही हा पर्याय निवडा. याचा परिणाम म्हणजेच या आयडीवरून तुमच्या खात्यावर ई-मेल येणे बंद होईल.

स्पॅम ईमेलसाठी फिल्टरचा वापर करा : जीमेल मध्ये एक फिल्टर पर्यायदेखील आहे जो तुम्ही स्पॅम ई-मेल शोधण्यासाठी आणि ई-मेल काढण्यासाठी वापरू शकता. हा पर्याय वापरण्यासाठी, तुम्हाला जी-मेलच्या सर्च बॉक्समध्ये जावे लागेल आणि अनसबस्क्राइब टाइप करावे लागेल. हे सुनिश्चित करेल की, सर्व सदस्यत्व रद्द आणि स्पॅम ई-मेल स्क्रीनवर दिसतील. आता येथे सर्व ई-मेल निवडल्यानंतर, मोअरवर क्लिक करा आणि या पर्यायाप्रमाणे फिल्टर संदेश निवडा. येथे तुम्हाला ईमेल डिलीट करण्याचा पर्यायही मिळेल.

दोन ई-मेल खाती वापरा : दोन ई-मेल खाती वापरणे हा हॅकर्स आणि ऑनलाइन फसवणूक टाळण्याचा एक चांगला मार्ग आहे. तुमचा पहिला ई-मेल आयडी अधिकृत कामासाठी, स्मार्टफोन आणि बँका इत्यादींसाठी वापरा, तर दुसरा ई-मेल आयडी संकेतस्थळाला भेट देणे, ऑनलाइन खरेदी करणे किंवा तिकीट बुक करणे यासारख्या क्रियाकलापांसाठी वापरा. याच्या मदतीने तुम्ही तुमच्या पहिल्या ईमेल आयडीवर येणारे स्पॅम ई-मेल टाळू शकाल.

# लोकशाही : एक सार्वत्रिक मूल्य

२००७ सालच्या राष्ट्रकूलच्या सर्वसाधारण सभेत या जागतिक लोकशाही दिनाची घोषणा झाली होती. त्यानंतर जगात सर्वत्र १५ सप्टेंबर रोजी लोकशाही दिन साजरा करण्यात येतो. त्यामागे, एक पार्श्वभूमी होती.

फर्निनंड माकोर्स या फिलीपिनमधल्या हुकूमशहाची २० वर्षांची सत्ता तिथल्या जनशक्ती क्रांतीदलाने उलथवून लावली, तेव्हा तिथल्या नव्या राष्टाध्यक्ष कोसाझोन अक्विनो यांच्या अध्यक्षतेखाली १९८८ साली एक आंतरराष्ट्रीय परिषद भरली होती. अस्तित्वात असलेल्या व नव्याने उदयास आलेल्या प्रजासत्ताक राज्याच्या तत्त्वपूर्ण नियमावलीची प्रतिष्ठना करणे हा या परिषदेचा हेतू होता.



या परिषदेच्या कतार, दोहा येथे भरलेल्या सभेत लोकशाहीच्या हितार्थ राष्ट्रकुलाने पुढाकार घ्यावा याचा पुनरुच्चार झाला. पुढे १९९७च्या सप्टेंबरमध्ये आंतरलोकसभा संघटनेने लोकशाही मूल्याचा उद्घोष केला आणि राष्ट्रकुलाला जागतिक लोकशाही दिन जाहीर केला.

लोकशाही हे एक सार्वत्रिक मूल्य आहे, ज्यामुळे प्रत्येक नागरिकाला विचार स्वातंत्र्य प्राप्त होते व तो सार्वजनिक बंधने पाळीत मुक्तपणे आपले जीवन जगू शकतो. आपल्या हक्कांची मागणी करीत असताना, नागरिकाने आपल्या कर्तव्याचे पालन केले तर लोकशाही अखिल मानवतेला हितकारक ठरते.

लोकसत्ताक राज्याला इंग्रजीत 'डेमोक्रसी' हा प्रतिशब्द आहे व तो ग्रीक शब्द 'डेमोज' म्हणजे लोकं आणि 'क्रेटीन' म्हणजे राज्य करणे, यावरून अप्रभ्रंशित झाला आहे. लोकांनीच राज्य करण्याची प्रथा ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकात ग्रीकांनी सुरू केली होती. समानता आणि स्वातंत्र्याद्वारे सार्वजनिक जीवनात शांती पसरावी हा लोकशाहीचा हेतू असतो. त्यामुळे, सार्वजनिक कामकाजात नागरिकांना हस्तक्षेप करण्याचा अधिकार लाभलेला असतो.

मानवी हक्क अबाधित राखून, त्याचे संवर्धन करणे हे लोकशाहीचा तो मुख्य हेतू असतो. त्यासाठी लोकांना नागरी व राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजवावी लागते. लिंग, जात, धर्म या सर्वापेक्षाही मानवता महान हेच लोकशाहीचे सूत्र असते.

महिलांच्या सहभागाने तर लोकशाहीची शान वाढते, परंतु लोकसंख्येत अर्धा वाटा असूनही जगातल्या लोकसभांत त्यांचा सहभाग अल्पसा आहे. तो वाढावा म्हणून देखील आजच्या दिवसाची जागृती आहे. प्रत्येक नागरिकाला आपल्या हक्कांची जाणीव करून देणे हा आजच्या दिवसाचा हेतू साध्य झाला तरच, अब्राहम लिंकन यांनी म्हटल्याप्रमाणे 'लोकांनी लोकांसाठी, लोकांकरवी' चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही, हे खरे ठरेल!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीदेखील लोकशाही म्हणजे केवळ शासन यंत्रणेचे स्वरूप नव्हे, तर लोकशाही म्हणजे सहकार्य आणि संवादात्मक सहवास्तव्य व इतरांविषयी आदराची भावना आहे, असे सांगितले आहे.

## क्लिक...क्लिक...!



**श्रीवर्धन : शांत, निवांत सायंकाळी दिवेआगर येथील रूप नारायण मंदिर परिसर आजूबाजूच्या नारळी-पोफळीच्या वाड्यांमुळे आणखी खुलून दिसतो.** (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर

# आरोग्याच्या अनेक समस्यांवर दालचिनीचे पाणी फायदेशीर

जेवण बनवताना खाद्यपदार्थांची चव आणि सुगंध वाढवण्यासाठी दालचिनीचा वापर केला जातो. प्रत्येक स्वयंपाकघरात दालचिनी असतेच, पण याच्या नियमित सेवनाने आरोग्याशी संबंधित अनेक समस्यांपासूनही सुटकाही मिळू शकते हे बऱ्याच जणांना माहित नसते.



दालचिनीमध्ये पॉलीफेनॉल असते, जे पोटाशी संबंधित समस्यांसाठी फायदेशीर ठरते. एवढेच नाही तर त्यात अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-फंगल हे गुणधर्म आढळतात, जे वजन कमी करण्यापासून ते रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यापर्यंत आरोग्याशी निगडित बाबींमध्ये फायदेशीर ठरतात, तसेच दालचिनीच्या पाण्याचे नियमित सेवन केल्याने सांधेदुखीच्या समस्येपासुनही आराम मिळतो. असे अनेक फायदे असणाऱ्या दालचिनीच्या पाण्याचे सेवन केल्याने कोणते आरोग्यासाठी कोणते फायदे होतात आणि हे पाणी बनवण्याची प्रक्रिया काय आहे जाणून घेऊया.

वजन कमी करण्यासाठी फायदेशीर : जर तुम्ही तुमच्या वजन कमी करण्यासाठी प्रयत्न करत असाल तर दालचिनीचे पाणी तुम्हाला खूप मदत करू शकते. दालचिनीचे पाणी प्यायल्याने मेटाबॉलिजम वाढते, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. विशेषत: सकाळी या पाण्याचे सेवन केल्यास वजन झपाट्याने कमी होण्यास मदत होते.

रोगप्रतिकारकशक्ती वाढवते : दालचिनीचे पाणी प्यायल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढते. दालचिनीमध्ये पॉलिफेनॉलसोबतच अँटी-व्हायरल, अँटी-ऑक्सिडंट आणि अँटी-फंगल हे गुणधर्मही आढळतात, जे रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी मदत करतात.

सांधेदुखीची वेदना कमी करण्यास उपयुक्त : जर तुम्ही सांधेदुखीच्या वेदनांनी त्रस्त असाल, तर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार तुम्ही दालचिनीच्या पाण्याचे सेवन करू शकता. यात मुख्यत्वे अँटी-इंफ्लेमेटरी, अँटी-ऑक्सिडंट गुणधर्म आढळतात जे शरीरातील वेदना आणि सूज कमी करतात.

पोटाशी संबंधित समस्यांवर फायदेशीर : दालचिनीचे पाणी प्यायल्याने पोटाशी संबंधित समस्या दूर होण्यास मदत होते. बद्धकोष्ठतेपासून सुटका मिळण्याबरोबर हे पाणी पचनसंस्था सुधारण्यासही मदत करते. ज्यामुळे पोट फुगल्यासारख्या समस्यांवरही लवकर आराम मिळू शकतो.

रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99 REGD. No. D. L.-33004/99

# भारत का राजपत्र
# The Gazette of India

सी.जी.-डी.एल.-अ.-24082022-238344
CG-DL-E-24082022-238344

असाधारण
EXTRAORDINARY

भाग II—खण्ड 3—उप-खण्ड (ii)
PART II—Section 3—Sub-section (ii)

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 3790] नई दिल्ली, मंगलवार, अगस्त 23, 2022/भाद्र 1, 1944
No. 3790] NEW DELHI, TUESDAY, AUGUST 23, 2022/BHADRA 1, 1944

## सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय

### अधिसूचना

नई दिल्ली, 23 अगस्त, 2022

**का.आ. 3964(अ).**—केन्द्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम, 1956 (1956 का 48) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा 3क की उप-धारा (1) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात् कि महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH166D के कि.मी. 0 से कि.मी. 14.35 (उपविभागीय कार्यालय पेण) तक के भू-खण्ड के निर्माण (चौड़ीकरण/पेव्ड शोल्डर सहित 2-लेन/4-लेन का बनाना आदि), अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो उक्त भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (1) के अधीन पूर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा।

ऐसी प्रत्येक आपत्ति सक्षम प्राधिकारी, अर्थात् उपविभागीय अधिकारी पेण को लिखित रूप में प्रस्तुत की जाएगी और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप में या किसी विधिक पेशेवर द्वारा सुने जाने का अवसर देगा और ऐसी आपत्तियों की सुनवाई के पश्चात् तथा ऐसी और जाँच करने के पश्चात्, यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश द्वारा या तो आपत्तियों को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा।

उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (2) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेश अंतिम होगा।

इस अधिसूचना के अंतर्गत आने वाली भूमि के रेखांक और अन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका हितबद्ध व्यक्तियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है।

### अनुसूची

**महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH166D के कि.मी. 0 से कि.मी. 14.35 (उपविभागीय कार्यालय पेण ) के लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण।**

| राज्य का नाम: महाराष्ट्र | जिले का नाम: रायगड | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई) | भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर) |
| तालुक का नाम: पेण | | | | | |
| गांव का नाम: आंबेघर | | | | | |
| 1 | 247/1 | निजी | नम | 0.0030000(हेक्टेयर) | 0.0030000 |
| 2 | 267/1 | निजी | नम | 0.0050000(हेक्टेयर) | 0.0050000 |
| 3 | 273/1 | निजी | नम | 0.0030000(हेक्टेयर) | 0.0030000 |
| 4 | 285/1 | निजी | नम | 0.0020000(हेक्टेयर) | 0.0020000 |
| 5 | 305/1 | निजी | नम | 0.0345000(हेक्टेयर) | 0.0345000 |
| 6 | 306/A | निजी | नम | 0.1000000(हेक्टेयर) | 0.1000000 |
| 7 | 307/1 | निजी | नम | 0.0870000(हेक्टेयर) | 0.0870000 |
| 8 | 310/2 A | निजी | नम | 0.0045000(हेक्टेयर) | 0.0045000 |
| 9 | 331 | निजी | नम | 0.0600000(हेक्टेयर) | 0.0600000 |
| 10 | 98/1 | निजी | नम | 0.0165000(हेक्टेयर) | 0.0165000 |
| 11 | KHAN | सरकारी | शुष्क | 0.0255000(हेक्टेयर) | 0.0255000 |
| 12 | KHAN | सरकारी | शुष्क | 0.0115000(हेक्टेयर) | 0.0115000 |
| गांव का नाम: धावटे | | | | | |
| 1 | 11/2 Part | निजी | नम | 0.0050000(हेक्टेयर) | 0.0050000 |
| 2 | 11/5 Part | निजी | नम | 0.0088000(हेक्टेयर) | 0.0088000 |
| 3 | 14/1 A Part | निजी | नम | 0.0245000(हेक्टेयर) | 0.0245000 |
| 4 | 14/1 B Part | निजी | नम | 0.0015000(हेक्टेयर) | 0.0015000 |
| 5 | 20/2 Part | निजी | नम | 0.0350000(हेक्टेयर) | 0.0350000 |
| 6 | 21/1 Part | निजी | नम | 0.0195000(हेक्टेयर) | 0.0195000 |
| 7 | 25/1 Part | निजी | शुष्क | 0.0100000(हेक्टेयर) | 0.0100000 |
| 8 | 25/3 A Part | निजी | शुष्क | 0.0240000(हेक्टेयर) | 0.0240000 |
| 9 | 25/3 B Part | निजी | शुष्क | 0.0115000(हेक्टेयर) | 0.0115000 |
| 10 | 25/4 Part | निजी | शुष्क | 0.0490000(हेक्टेयर) | 0.0490000 |
| 11 | 30/1 | निजी | शुष्क | 0.0300000(हेक्टेयर) | 0.0300000 |
| 12 | 31/2 B/2 | निजी | शुष्क | 0.0250000(हेक्टेयर) | 0.0250000 |
| 13 | 31/2/A/1 | निजी | शुष्क | 0.0250000(हेक्टेयर) | 0.0250000 |
| 14 | 31/2B/4 Part | निजी | नम | 0.1730000(हेक्टेयर) | 0.1730000 |
| 15 | 40/0 Part | निजी | शुष्क | 0.0980000(हेक्टेयर) | 0.0980000 |
| 16 | 40/A | निजी | शुष्क | 0.0200000(हेक्टेयर) | 0.0200000 |
| 17 | 56/1 A Part | निजी | नम | 0.0330000(हेक्टेयर) | 0.0330000 |
| 18 | 56/4 Part | निजी | नम | 0.0200000(हेक्टेयर) | 0.0200000 |
| 19 | 72/0 Part | निजी | शुष्क | 0.0065000(हेक्टेयर) | 0.0065000 |
| 20 | 73/2 Part | निजी | नम | 0.0070000(हेक्टेयर) | 0.0070000 |
| 21 | 74/2 Part | निजी | नम | 0.0185000(हेक्टेयर) | 0.0185000 |
| 22 | 79/0 Part | निजी | शुष्क | 0.0100000(हेक्टेयर) | 0.0100000 |
| 23 | 9/1A Part | निजी | नम | 0.0165000(हेक्टेयर) | 0.0165000 |
| 24 | १०/3A Part | निजी | नम | 0.0070000(हेक्टेयर) | 0.0070000 |
| गांव का नाम: गागोदे बुद्रूक | | | | | |
| 1 | 148/A Part | निजी | शुष्क | 0.1240000(हेक्टेयर) | 0.1240000 |
| 2 | 149 Part | निजी | नम | 0.0070000(हेक्टेयर) | 0.0070000 |
| 3 | 298 Part | निजी | शुष्क | 0.0065000(हेक्टेयर) | 0.0065000 |
| गांव का नाम: गागोदे खुर्द | | | | | |
| 1 | 409/1 Part | निजी | शुष्क | 0.0485000(हेक्टेयर) | 0.0485000 |
| 2 | 417 Part | सरकारी | शुष्क | 0.0025000(हेक्टेयर) | 0.0025000 |
| 3 | 419 Part | निजी | शुष्क | 0.0880000(हेक्टेयर) | 0.0880000 |
| गांव का नाम: करंबेली छत्तीशी | | | | | |
| 1 | 53/1 TO5/21 | निजी | शुष्क | 0.0018000(हेक्टेयर) | 0.0018000 |
| 2 | 53/1TO5/5 | निजी | शुष्क | 0.0625000(हेक्टेयर) | 0.0625000 |
| 3 | 54/1 TO5/12 | निजी | शुष्क | 0.0560000(हेक्टेयर) | 0.0560000 |
| 4 | 54/1 TO5/13 | निजी | शुष्क | 0.0550000(हेक्टेयर) | 0.0550000 |
| 5 | 54/1 TO5/14 | निजी | शुष्क | 0.0780000(हेक्टेयर) | 0.0780000 |
| 6 | 78 Part | सरकारी | शुष्क | 0.0340000(हेक्टेयर) | 0.0340000 |
| 7 | 88 Part | सरकारी | शुष्क | 0.0895000(हेक्टेयर) | 0.0895000 |
| 8 | KHAN | सरकारी | शुष्क | 0.0660000(हेक्टेयर) | 0.0660000 |
| | | | कुल | 1.7501 | 1.7501 |

[फा. सं. RW/NH-12014-150/2O17-MAH-Zone IV/3A]

राजेश गुप्ता, निदेशक

## MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS

### NOTIFICATION

New Delhi, the 23rd August, 2022

**S.O. 3964(E).**—In exercise of powers conferred by sub-section (1) of section 3A of the National Highways Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government, after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of which is given in the Schedule below, is required for building (widening/two lane with paved shoulder/four laning etc.,), maintenance, management and operation of NH166D in the stretch of land from Km 0 to Km14.35 (Sub Divisional Office Pen) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA, hereby declares its intention to acquire such land.

Any person interested in the said land may, within twenty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, object to the use of such land for the aforesaid purpose under sub-section(1) of section 3C of the said Act;

Every such objection shall be made to the Competent Authority, namely, Sub Divisional Officer Pen in writing and shall set out the grounds thereof and the Competent Authority shall give the objector an opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks necessary, by order, either allow or disallow the objections;

Any order made by the Competent Authority under sub-section (2) of section 3C of the said Act shall be final.

The land plans and other details of the land to be acquired under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority.

### SCHEDULE

**Brief Description of the land to be acquired with or without structures falling NH166D in the stretch of land from Km. 0 to Km. 14.35 (Sub Divisional Office Pen) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA**

| State: MAHARASHTRA | District: RAIGAD | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Survey / Plot Number | Type of Land | Nature of Land | Area (in Local Unit) | Area (in Hectare) |
| Taluk: Pen | | | | | |
| Village: Ambeghar | | | | | |
| 1 | 247/1 | Private | Wet | 0.0030000(Hectare ) | 0.0030000 |
| 2 | 267/1 | Private | Wet | 0.0050000(Hectare ) | 0.0050000 |
| 3 | 273/1 | Private | Wet | 0.0030000(Hectare ) | 0.0030000 |

जाहिरातीचा पुढील भाग पान ७ वर

# पनवेलमध्ये फेरीवाल्यांचे सर्वेक्षण

## 'दीनदयाळ अंत्योदय', 'राष्ट्रीय नागरी उपजीविका'द्वारे महापालिकेचा उपक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत नागरी पथविक्रेत्यांना सहाय्य उपांगाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पनवेल महानगरपालिकेतर्फे महानगरपालिका क्षेत्रातील स्थिर, फिरते, व तात्पुरते अशा सर्व फेरीवाल्यांचे सर्वेक्षण बायोमेट्रीक पध्दतीने करण्यात येत आहे. ज्या फेरीवाल्यांचे सर्वेक्षण झालेले नाही, त्यांनी येत्या आठ दिवसांमध्ये आपले सर्वेक्षण करून घ्यावे, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी सर्व फेरीवाल्यांना केले आहे. आत्तापर्यंत महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकुण ७७१० फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे व



त्यापैकी ३२७३ फेरीवाल्यांनी सर्वेक्षण झाल्यानंतर संबंधित कागदपत्रे महानगरपालिकेकडे जमा केली आहेत. उर्वरित ४४३७ फेरीवाल्यांचे कागदपत्र जमा करण्याचे प्रलंबित आहेत. त्यांनीसुध्दा येत्या आठ दिवसामध्ये प्रभाग समिती 'ड'च्या महापालिकेच्या विलासराव देशमुख व्यापारी संकुल, पहिलामजला गाळा क्र.११४ शिवाजी चौक येथे कागदपत्रे जमा करावीत. सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर ज्या फेरीवाल्यांनी संबधित कागदपत्रे सादर केली आहेत, अशा फेरीवाल्यांची अंतिम पात्र यादी करण्यात येणार आहे. त्यांना फेरीवाला असल्याचे ओळखपत्र व प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. ज्या फेरीवाल्यांकडे ओळखपत्र व प्रमाणपत्र असेल त्यांनाच अधिकृत फेरीवाला म्हणून व्यवसाय करण्याची परवानगी देण्यात येणार आहे.

### फेरीवाला नोंदणी करण्यासाठीचे पात्रता निकष

१. भारतीय नागरिक असावा.
२. फेरीवाला महाराष्ट्रातील अधिवासी असावा.
३. सर्वेक्षणावेळी १६ वर्षापेक्षा कमी फेरीवाल्याचे वय नसावे.
४. पथविक्री खेरीज उपजिवीकेचे कोणतेही साधन नसावे.

### आवश्यक असणारी कागदपत्रे

१. मोबाईल लिंक असलेले आधारकार्ड.
२. तहसीलदारांनी दिलेले अधिवास प्रमाणपत्र. (डोमोसाईल सर्टिफिकीट)
३. शिधापत्रिका (रेशनकार्ड).
४. जात प्रमाणपत्र (एसी, एसटी, अल्पसंख्यांक असल्यास).
५. दिव्यांग प्रमाणपत्र ( दिव्यांग असल्यास).
६. विधवा असल्यास पतीचे मृत्यू प्रमाणपत्र.
७. परित्यक्ता किंवा घटस्फोटित असल्यास प्रमाणीकरण कागदपत्र.
८. पासपोर्ट आकाराचे दोन फोटो.

# वाहनचालकास चाकूचा धाक दाखवून चोरी करणारा जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई व रायगड जिल्ह्यात ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीस प्रवासी म्हणून वहानात बसून प्रवास करीत असताना अचानक काही बहाणा करून वाहन थांबवून वाहनचालकाला चाकूचा धाक दाखवून त्याची कार, रक्कम जबरीने लुटण्याप्रकरणी गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने आरोपीस जेरबंद केले आहे.

पनवेल जवळील मॅक्डोनाल्ड, कळंबोली समोर पुणे येथे जायचे असे सांगून चार व्यक्ती खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या आर्टिका कार (एमएच ०८ एएन ९५७६) मध्ये बसले. ही कार मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वरून पुण्याच्या दिशेने जात असताना भाताण बोगद्याच्या जवळ आली त्या वेळी चार व्यक्तींपैकी एकाने बाथरूमला जाण्याचा बहाणा करून कार बाजूला घेण्यास सांगितले. त्याचवेळी त्याच्या सोबतच्या तीन जणांनी ड्रायव्हरला चाकूचा धाक दाखवून त्याच्याकडून रोख रक्कम व कार जबरीने घेऊन गेले. याबाबत कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हाची नोंद झाली. यानंतर

पोलिसांच्या पथकाने आरोपींच्या येण्याजाण्याच्या मार्गावरील सीसीटीव्ही फुटेज पाहून तांत्रिक तपास करीत टेंबोडे ब्रिजच्या आसपास सापळा रचला. यामध्ये महेंद्रप्रताप उर्फ अंकीत ग्यानेंद्र सिंग (वय ३०, रा. कलंबोली मूळ गाव-प्रतापगड, राज्य उत्तर प्रदेश) याला ताब्यात घेतले. त्याच्या अंगझडतीमध्ये नंबर प्लेट नसलेली एर्टिगा कार मिळून आली. अटक आरोपीकडून एकुण १०,००,००० रुपये किमतीची कार जप्त करण्यात आली आहे.



# पनवेल शहर पोलिसांचे कौतुक

**पनवेल : वार्ताहर**

वडघर कोळीवाडा येथील गणेश विसर्जनादरम्यान प्रसंगावधान राखत पनवेल शहर पोलीस ठाण्याचे दलाचे अधिकारी यांनी वेळीच जनरेटरमधून सुरू असलेल्या विजप्रवाह वाहिनी बाजूला केली. त्यामुळे विसर्जनासाठी आलेले भाविक विजझटक्यापासून वाचू शकले. त्यांच्या या कामगिरीचे नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह यांनी कौतूक केले आहे.

पनवेलमधील कोळीवाड्याशेजारी घरगुती गणेशमुर्तींच्या विसर्जनासाठी पालिकेने जनरेटरच्या विजेवर या परिसरात रात्री अंधार होऊ नये म्हणून जनरेटर लावले होते. विसर्जनावेळी मुसळधार पावसामुळे जनरेटरची वायर तुटली आणि विसर्जनासाठी आलेल्या मानस कुंभार या तरुणाच्या अंगावर पडली. हे पाहून त्याचे कुटुंबीय वाचवण्यासाठी आले असता त्यांनाही विजेचा शॉक बसला. लागलीच गणेशभक्तांची धावपळ सुरू झाली.

या विसर्जन स्थळी शांतता राखण्यासाठी कर्तव्यावर असणारे पनवेल शहर पोलीस ठाण्याचे निरिक्षक संजय जोशी, सहाय्यक निरिक्षक



शिवाजी हुलगे यांच्यासह एस. आर. पी. एफ. च्या गोरेगाव ब तुकडीचे उत्तम बबन चातशे, प्रशांत भाऊसाहेब साबळे, सागर जाधव यांनी घटनेतील गांभीर्य ओळखून सर्वप्रथम विजेचा झटक्यामुळे हा सर्व गोंधळ उडाल्याची खात्री काही क्षणात केली. तसेच जनरेटरमधून सुरू असलेल्या विजप्रवाह वाहिनी बाजूला केला त्यामुळे या ठिकाणचे नागरिक विजझटक्यापासून वाचू शकले. त्यांच्या या कामगिरीचे नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह यांनी कौतूक केले आहे. तसेच पनवेलमधील विविध सामाजिक संघटना, नागरिकांनीही पोलिसांचे कौतूक केले.

# भाजप ट्रान्सपोर्ट सेलच्या जिल्हाध्यक्षपदी संकेत पाटील

**पनवेल : वार्ताहर**

भाजप ट्रान्सपोर्ट सेलचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष हाजी अरफात शेख यांनी रायगड जिल्हा नव भारतीय शिव वाहतूक संघटना भाजपा ट्रान्सपोर्ट सेलच्या जिल्हाअध्यक्ष पदी संकेत पाटील यांची नियुक्ती केल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे .

याबाबत महाराष्ट्र राज्य अध्यक्ष हाजी अरफात शेख यांनी संकेत पाटील यांना नियुक्ती पत्र देऊन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या वेळी निलेश निम्हण, मनोज रामराजे, देवेंद्र उपाध्यय, शेरू भाई, रेहमान भाई, सारंग पाटील, मयूर पाटील व सचिन पाटील आदी उपस्थित होते.



# रामचंद्र म्हात्रे विद्यालयात करिअर मार्गदर्शन

**उरण : बातमीदार**

रामचंद्र म्हात्रे विद्यालय आवरे येथे करिअर मार्गदर्शन आणि मोफत एसटी बस पास वितरण समारंभ मंगळवारी (दि. १३) झाला. या वेळी प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीया फाऊंडेशन, पाले अध्यक्ष व कॉमन सर्विस सेंटर कोप्रोलीच्या संचालिका स्मिता संदीप म्हात्रे, रामचंद्र म्हात्रे विद्यालयाचे प्राचार्य सुभाष ठाकूर, स्नेहा पाटील खोपटे व सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शासनाच्या योजनेंतर्गत शाळेतील सहावी ते बारावीच्या १०७ विद्यार्थिनींना मोफत एसटी बस पास वितरण करण्यात आले. तर श्रीया फाऊंडेशन पालेतर्फे २५ मुलींना ऑनलाइन इंग्लिश स्पीकिंग कोर्स



मोफत देण्यात आला.

या वेळी उपस्थित मुलींना मार्गदर्शन करताना करिअर कसे घडवावे, ध्येय गाठण्यासाठी आजूबाजूच्या परिस्थितीचा कसा लाभ घ्यावा, दैनंदिन जीवनात शिक्षणाचा कसा वापर करावा, मोबाईलचा वापर आपल्या करिअरसाठी कसा करायचा, मोठी स्वप्ने बघून कसे ध्येय गाठायचे याबद्दल स्मिता म्हात्रे यांनी मार्गदर्शन केले. तर प्राचार्य सुभाष ठाकूर यांनी मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्त्व व त्याद्वारे आपले करिइर कसे घडवायचे, आजूबाजूला कर्तृत्ववान माणसे असतात त्यांच्या विचाराने प्रेरित होऊन आपले ध्येय कसे साध्य करायचे याबद्दल मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक संगीता म्हात्रे, तर उपस्थितांचे आभार सुश्मिता घरत यांनी मानले. विशेष सहकार्य निवास गावंड व विद्याधर गावंड यांनी केले.

# कळंबोली जंक्शनवरील सीसीटीव्ही सुरू करा

## स्त्री शक्ती फाउंडेशनची सिडकोकडे मागणी

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली जंक्शन वरील बंद सीसीटीव्ही कॅमेरे सुरू करून त्यांची संख्या वाढविण्याची मागणी स्त्री शक्ती फाऊंडेशनने सिडको कडे केली आहे.

स्त्री शक्ती फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष विजया कदम यांनी सिडको टेलिकॉम विभागाचे मुख्य अभियंता यांची भेट घेऊन कळंबोली येथून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग सुरू होतो. याशिवाय पनवेल-सायन, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ आणि ४ ब सिडकोकडे आहे. मुंबई-गोवा महामार्गाला जाण्यासाठी कळंबोली सर्कलवरूनच मार्ग आहे. विशेष करून जेएनपीटीकडे मोठ्या प्रमाणात वाहने एन एच४बीवरून जातात आणि येतात. कळंबोली स्टील मार्केट परिसरातही अवजड वाहने येतात. मुंबईकडे येथूनच सर्व लहान-मोठे वाहने जातात. एकंदरीतच २४ तास येथे वाहनांची वर्दळ असते. चारही बाजूने वाहने येत अस तरी जेएनपीटीकडे जाणाऱ्या येणाऱ्या कंटेनरची संख्या जास्त आहे. हे जंक्शन अतिशय महत्त्वाचे असून चारही बाजूला महामार्ग जातात. या ठिकाणी दररोज लहान-मोठे अपघात घडतात. त्याचबरोबर गुन्हेगारांचे वाहने परस्पर विरोधी दिशेने जातात. त्यांच्यावर वॉच ठेवण्याची अत्यंत आवश्यकता आहे. तसेच वाहतूक कोंडी फोडण्याच्या दृष्टिकोनातून येथे लक्ष असणे गरजेचे आहे. वाहतुकीच्या नियम तोडणारे चालक त्वरित डिटेक्ट होणे क्रमप्राप्त आहे.

या पार्श्वभूमीवर कळंबोली सर्कलला सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची आवश्यकता आहे. सिडकोने काही पॉईंटवर हे कॅमेरे बसवले सुद्धा, मात्र ते बंद अवस्थेत असल्याचे समजते. त्यामुळे त्या कॅमेऱ्यांचा काहीच फायदा नसल्याचे दिसून येत आहे. बंद अवस्थेतील असलेले सीसीटीव्ही कॅमेरे त्वरित सुरू करण्यात याव्यात. त्याच बरोबर कळंबोली सर्कल वर कॅमेऱ्यांची संख्या वाढवण्यात यावी जेणेकरून या जंक्शन वर चारही बाजूने करडी नजर ठेवता येईल. स्थानिक पोलीस तसेच वाहतूक पोलिसांचे काम सोपस्कर होईल. येथे वाहतुकीचे नियम जे मोडतात त्यांच्यावर वचक ठेवता येईल तसेच गुन्हेगारांना पकडणे सोपे होईल. अपघात करून पळ काढणाऱ्या वाहन चालक कोणत्या दिशेला गेला आहे हेसुद्धा समजेल. तसेच वाहतूक कोंडी फोडण्यासाठी मदत होईल या सर्व पार्श्वभूमीवर कळंबोली सर्कल पूर्णपणे क्लोज सर्किट कॅमेऱ्यांच्या नजरेखाली आणण्यात यावेत, अशा प्रकारची मागणी नोडल एजन्सी म्हणून आपल्याकडे करीत असल्याचे स्त्री शक्ती फाऊंडेशनच्या संस्थापक, अध्यक्ष विजया कदम यांनी सांगितले.



**पनवेल : जीएसटी कर्मचाऱ्यांसाठी खारघर येथे निवासी संकुल बांधण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन बुधवारी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी ना. सीतारामन यांचे भाजप खारघर मंडलतर्फे अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांनी स्वागत केले.**

# चित्रपट बॉईज थ्रीचे प्रोमोशन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मराठी चित्रपट बॉईंज वन आणि बॉईज टू च्या यशानंतर बॉईज थ्री चित्रपट अंतिम टप्प्यात असून लवकरच रिलीज होत आहे. या चित्रपटाच्या प्रोमोशनसाठी बाईज थ्री टिम मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील शेडुंग टोलनाक्याजवळ असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठात बाईज थ्री चित्रपटाच्या प्रोमोशनसाठी तसेच विद्यापीठात नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठामध्ये आली होती.

या चित्रपटाचे कलाकार पार्थ भालेराव, सुमंत शिंदे, विशाल दुर्वेकर, विदुला चौगुले आणि त्यांची सर्व टीम या वेळी हजर होती. कार्यक्रमाची सुरुवात श्री गणेशाच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून



दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यानंतर बॉईंज थ्रीच्या कलाकारांनी कॉमेडी आणि डान्स करून मनोरंजनाद्वारे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. या वेळी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रमांचे आयोजनही केले होते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी सर्व कलाकारांसोबत संवाद साधला आणि मनोरंजन केले .

या वेळी विद्यापीठाचे रजिस्ट्रार डॉ. आर. पी. शर्मा, सेंट विल्फ्रेडस लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. एम. पांडे उपस्थित होते. या वेळी डायरेक्टर ॲडमिशन डॉ. मोहसीन हसन, डेप्युटी रजिस्ट्रार विठ्ठल धुमाळ, सांस्कृतिक प्रमुख महेश जाधव, डॉ. कल्पना दाभाडे, डॉ. सोनी पाठक, डॉ. आर. पी. सिंग, डॉ. एस. पी. मिश्रा, डॉ. गीता कोहाडे, डॉ. विकास कुमार, राकेश जुन्नरकर, विश्वेश सर, ॲडमिशन मॅनेजर निशा सिंग, डॉ. अनिरुद्ध साखरे, डॉ. प्रवीण गुप्ता, प्रीती बन्सल, डॉ. निशी फातिमा, डॉ. पंकज द्विवेदी यांच्या नियोजनातून कार्यक्रम व्यवस्थितरित्या झाला.

# नोकरीचे प्रलोभन दाखवून फसवणूक

**पनवेल :** कामोठ्यातील एका तरुणाला नोकरी लावण्याचे प्रलोभन दाखवून फसवणूक केल्याचा प्रकार घडला. या प्रकरणी संदीप भांगरे याच्याविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत कामोठ्यातील विशाल पवार यांनी तक्रार दिली आहे. विशालची डिसेंबर २०२०मध्ये संदीप भांगरे याच्यासोबत ओळख झाली. तुमच्या भावाला नेव्हीमध्ये नोकरी मिळवून देतो असे प्रलोभन दाखविले. त्याच्यावर विश्वास ठेवून डिसेंबर २०२० ते मार्च २०२१दरम्यान सात लाख ३० हजार रुपये त्याला दिले. दरम्यान, लॉकडाऊननंतर फोन बंद केला. विशाल यांनी भांगरे याच्या मावळ तालुक्यातील गावी जाऊन चौकशी केली असता त्याने यापूर्वी अनेकांची फसवणूक केली असल्याचे समजले. त्यामुळे विशालने तक्रार दिली आहे.

# गौरा गणेश दर्शन


अनंत चतुर्दशीनंतर साखरचौथीच्या म्हणजेच गौरा गणपतींचे आगमन झाले आहे. सार्वजनिक व घरोघरी स्वरूपात हा बाप्पा विराजमान करून त्याची सेवा केली जाते. या गणेशोत्सवाची चित्रमय झलक.



विघ्नहर्ता गणेश मित्रमंडळ, गोवठणे, उरण



तरुण उत्साही मित्र मंडळ, वर्ष १२ वे, पळस्पे, पनवेल



सिद्धेश्वर सेवा भावी युवा मंडळ, दिघोडे, उरण



स्मरण विकास पाटील, जासई, उरण



पनवेल : शहरातील जोशी आळी येथील अष्टविनायक मित्र मंडळाच्या गौरा गणपतीचे भाजप शहर खजिनदार संजय जैन यांनी दर्शन घेतले. या वेळी पत्रकार संजय कदम, उद्योजक सचिन कल्याणकर, मंडळाच्या वतीने रुपेश म्हापुस्कर, सागर मुंडे, कुणाल जैतपाल आदी उपस्थित होते.

# कर्जतमध्ये डेंग्यू रुग्णसंख्येत वाढ

## नगर परिषदेकडून सर्वेक्षण सुरू

**कर्जत : बातमीदार**

नगर परिषदेकडून करण्यात आलेल्या कंटेनर सर्व्हेमध्ये कर्जत शहरात डेंग्यूसदृश्य रुग्ण आढळून आले. त्यामुळे नगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे पथक सर्व भागात फिरून नागरिकांना दक्षता घेण्याचे आवाहन करीत आहे. दरम्यान, नगर परिषदेतर्फे शहरात औषध फवारणी सुरु करण्यात आहे.

शहरात डेंग्यूसदृश्य रुग्ण आढळत असल्याची माहिती कर्जत उपजिल्हा रुग्णालयाकडून नगर परिषदेला देण्यात आली. त्यानंतर नगर परिषदेने तात्काळ शहरातील सर्व भागात कंटेनर सर्व्हे करण्यास सुरुवात केली. त्यात शहराच्या विविध भागात आतापर्यंत सुमारे २० आढळून आले. त्यातील सर्वाधिक रुग्ण विठ्ठलनगर, महावीर पेठ आणि दहिवली भागातील असल्याचे उपजिल्हा रुग्णालयाचे म्हणणे आहे. नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, नगर परिषदेचे आरोग्य निरीक्षक सुदाम म्हसे यांनी त्या भागात पाहणी केली.


(छाया : संतोष पेरणे)

कर्जत शहरात डेंग्यूचे रुग्ण आढळून आल्याने नगर परिषद सतर्क झाली आहे. नागरिकांना सूचना देण्यासाठी दवंडी देण्यास सुरूवात केली आहे. तसेच डेंग्यूच्या डासांची उत्पत्ती होऊ नये, यासाठी कोणती खबदारी घ्यायला हवी, याविषयी परिपत्रक काढले आहे.

**डेंग्यूचे डास हे स्वच्छ पाण्यावर वाढत असल्याने घरात आणि परिसरात पाणी साठवून ठेवू नये. कुलरमधील पाणी वारंवार बदलावे. डेंग्यूचा रुग्ण आढळल्यास उपजिल्हा रुग्णालय आणि नगर परिषदेस संपर्क साधावा.**
**–अशोक ओसवाल,**
**उपनगराध्यक्ष कर्जत नगर परिषद**

**डेंग्यूच्या आजारात ताप येतो, पेशी (प्लेटलेट्स) कमी होतात. त्या वेळी घाबरून जाऊ नये. त्या सर्वांनी तात्काळ नगरपालिकेला कळवावे आणि रुग्णालयात दाखल होऊन उपचार घ्यावेत.**
**–सुवर्णा जोशी, नगराध्यक्ष, कर्जत**

# महाडमध्ये पशुवैद्यकीय दवाखाने असून नसल्यासारखे, औषधांचीही वानवा

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील सर्वच पशुवैद्यकीय दवाखान्यात सध्या एकही अधिकारी व कर्मचारी कार्यरत नसल्याने तालुक्यातील पाळीव जनावरांच्या निरोगी आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या दवाखान्यांकडे डॉक्टर फिरकत नसल्याने दवाखान्यातील औषधांचेदेखील नुकसान झाले आहे. त्यामुळे या पशुवैद्यकीय दवाखान्यांत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात याव्यात, अशी मागणी महाड तालुक्यातील पशूधन पालकांकडून केली जात आहे.

महाड तालुक्यात जिल्हा परिषद आणि राज्य शासनाचे पशु वैद्यकीय दवाखाने आहेत. पावसाळ्यात शेळी, बैल, गाय, म्हैस आदी पाळीव जनावरांवर विविध आजार होत असतात. मात्र गावातील दवाखान्यांमध्ये पशुवैद्यकीय अधिकारीच नसल्याने पशु व शेळी पालकांच्या अडचणी वाढल्या आहेत. महाड तालुक्यात प्रत्येक पशुवैद्यकीय दवाखान्यात एक पशुवैद्यकीय अधिकाऱ्यासह त्यांचे सहकारी अशी पदे मंजूर आहेत. मात्र पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध होत नसल्याने हे दवाखाने बंद राहत आहेत.

महाड तालुक्यातील अनेक शेतकरी शेतीपूरक व्यवसाय म्हणून शेळी पालन व दुग्ध उत्पादनाचा व्यवसाय करतात. मात्र जनावरांना वेळीच आरोग्य सेवा मिळत नसल्याने त्यांच्या अडचणीत भर पडली आहे. नाईलाजास्तव शेतकऱ्यांना आपल्या गुरांवर खाजगी पशुवैद्यकीय डॉक्टरांकडून महागडा इलाज करून घ्यावा लागत आहे. या पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये गोचीडांचे औषध, जंताचे औषध, चाटण गोठा, कॅल्शियम पावडर इत्यादी औषधे नसल्यामुळे पशुपालन करणाऱ्यांसमोर ही औषधे कुठून आणायची असा प्रश्न निर्माण झाला आहे.

**पुरेसे कर्मचारी उपलब्ध नसल्याने तालुक्यात असलेल्या पशुवैद्यकीय डॉक्टरांना एकाहून अधिक दवाखान्यांना भेट द्यावी लागते. शिवाय बहुतांश दवाखाने मालकीचे नसल्याने अनेक समस्या उद्भवत आहेत.**
**–डॉ. एम. एस. लोंढे, पशुधन विकास अधिकारी, महाड**

**महाड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पशुधनासाठी पशुवैद्यकीय दवाखान्यांचा उपयोग होत होता, मात्र सध्या या भागात डॉक्टरांअभावी पशुवैद्यकीय दवाखाने बंद राहत आहेत यामुळे खाजगी डॉक्टरांना बोलवावे लागत आहे. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड बसत आहे.**
**–श्रीराम खोपकर, अमोल धाडवे, शेतकरी, महाड**


(छाया : महेश शिंदे)

# रोहा रेल्वे पोलिसांचे 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते'

## फलाटावर सापडलेल्या बालकास केले पालकांच्या स्वाधीन

**रोहे : प्रतिनिधी**

येथील रेल्वे पोलीस चौकीमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नुकताच ऑपरेशन ' नन्हे फरिश्ते ' अंतर्गत फलाटावर सापडलेल्या बालकास त्याच्या पालकांकडे सुपूर्द केले.

रेल्वे सुरक्षा बला तर्फे रेल्वेच्या मालमत्ता रक्षणासह प्रवशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विविध अभियान राबविण्यात येतात. रोहा रेल्वे पोलिसांचे मुख्य आरक्षक बी. के. दिवशे व बी. एस. वर्मा हे फलाट क्रमांक एकवर कर्तव्यावर होते. त्यावेळी त्यांना एक लहान मुलगा रडत असल्याचे आढळले. उपनिरिक्षक राकेश पाटीदार यांनी त्या मुलाची चौकशी करण्याचा प्रयत्न केला. मात्र ते मुल नाव व पत्ता सांगू शकत नव्हते. त्यानंतर त्यांनी आजुबाजुच्या परिसरात त्या बालकाच्या पालकांचा तपास सुरु केला. दरम्यान, अष्टमी येथे राहणारे मोहम्मद वाजीद व त्यांची पत्नी रेल्वे स्थानक परिसरात आले. ते आपल्या हरवलेल्या लहान मुलाचा शोध घेत असल्याचे समजले. त्यावेळी चौकीत असणारा बालक रेल्वे पोलिसांनी त्यांना दाखविला. आई, वडिलांनीं आपल्या मुलाला ओळखले व तो लहान मुलगाही धावत त्यांना जाऊन बिलगला.अरहान (वय ३) हा आपला मुलगा असून दुपारी घराबाहेर खेळता खेळता गायब झाला व तेव्हांपासून आम्ही त्याचा शोध घेत असल्याचे पालकांनी सांगितले. त्यानंतर कागदोपत्री कार्यवाही पूर्ण करत रोहा रेल्वे पोलिसांनी अरहान याला त्याच्या पालकांकडे सुपूर्द केला.


(छाया : महादेव सरसंबे)

# माणगाव भादावमधून अल्पवयीन मुलीचे अपहरण; गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील भादाव गावातून सोमवारी (दि. १२) एका अल्पवयीन मुलीला फूस लावून अपहरण केल्याप्रकरणी अज्ञात इसमावर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी जयदेव गायप्रसाद श्रीवास्तव (वय ४८, रा. भादाव ता. माणगाव) यांच्या बुलबुल (वय १४) या अल्पवयीन मुलीला मंगळवारी सकाळी अज्ञात इसमाने पळवून नेले. बुलबुलचा रंग गोरा, उंची चार फूट, बांधा सडपातळ, अंगात सफेद रंगाचा टी–शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट, कानात टॉप्स, गळ्यात काळा दोरा, नाकात सोन्याची चमकी, डाव्या हाताच्या अंगठ्याच्या बाजूला मराठीत ओम असे गोंदले आहे, पायामधे चॉकलेटी रंगाची चप्पल असे आहे. माणगाव पोलीस बुलबुलचा शोध घेत आहेत.

पान ५ वरुन

**Taluk: Pen**

**Village: Ambeghar**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 285/1 | Private | Wet | 0.0020000(Hectare ) | 0.0020000 |
| 5 | 305/1 | Private | Wet | 0.0345000(Hectare ) | 0.0345000 |
| 6 | 306/A | Private | Wet | 0.1000000(Hectare ) | 0.1000000 |
| 7 | 307/1 | Private | Wet | 0.0870000(Hectare ) | 0.0870000 |
| 8 | 310/2 A | Private | Wet | 0.0045000(Hectare ) | 0.0045000 |
| 9 | 331 | Private | Wet | 0.0600000(Hectare ) | 0.0600000 |
| 10 | 98/1 | Private | Wet | 0.0165000(Hectare ) | 0.0165000 |
| 11 | KHAN | Government | Dry | 0.0255000(Hectare ) | 0.0255000 |
| 12 | KHAN | Government | Dry | 0.0115000(Hectare ) | 0.0115000 |

**Village: Dhavte**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 11/2 Part | Private | Wet | 0.0050000(Hectare ) | 0.0050000 |
| 2 | 11/5 Part | Private | Wet | 0.0088000(Hectare ) | 0.0088000 |
| 3 | 14/1 A Part | Private | Wet | 0.0245000(Hectare ) | 0.0245000 |
| 4 | 14/1 B Part | Private | Wet | 0.0015000(Hectare ) | 0.0015000 |
| 5 | 20/2 Part | Private | Wet | 0.0350000(Hectare ) | 0.0350000 |
| 6 | 21/1 Part | Private | Wet | 0.0195000(Hectare ) | 0.0195000 |
| 7 | 25/1 Part | Private | Dry | 0.0100000(Hectare ) | 0.0100000 |
| 8 | 25/3 A Part | Private | Dry | 0.0240000(Hectare ) | 0.0240000 |
| 9 | 25/3 B Part | Private | Dry | 0.0115000(Hectare ) | 0.0115000 |
| 10 | 25/4 Part | Private | Dry | 0.0490000(Hectare ) | 0.0490000 |
| 11 | 30/1 | Private | Dry | 0.0300000(Hectare ) | 0.0300000 |
| 12 | 31/2 B/2 | Private | Dry | 0.0250000(Hectare ) | 0.0250000 |
| 13 | 31/2/A/1 | Private | Dry | 0.0250000(Hectare ) | 0.0250000 |
| 14 | 31/2B/4 Part | Private | Wet | 0.1730000(Hectare ) | 0.1730000 |
| 15 | 40/0 Part | Private | Dry | 0.0980000(Hectare ) | 0.0980000 |
| 16 | 40/A | Private | Dry | 0.0200000(Hectare ) | 0.0200000 |
| 17 | 56/1 A Part | Private | Wet | 0.0330000(Hectare ) | 0.0330000 |
| 18 | 56/4 Part | Private | Wet | 0.0200000(Hectare ) | 0.0200000 |
| 19 | 72/0 Part | Private | Dry | 0.0065000(Hectare ) | 0.0065000 |
| 20 | 73/2 Part | Private | Wet | 0.0070000(Hectare ) | 0.0070000 |
| 21 | 74/2 Part | Private | Wet | 0.0185000(Hectare ) | 0.0185000 |
| 22 | 79/0 Part | Private | Dry | 0.0100000(Hectare ) | 0.0100000 |
| 23 | 9/1A Part | Private | Wet | 0.0165000(Hectare ) | 0.0165000 |
| 24 | १0/3A Part | Private | Wet | 0.0070000(Hectare ) | 0.0070000 |

**Village: Gagode Budruk**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 148/A Part | Private | Dry | 0.1240000(Hectare ) | 0.1240000 |
| 2 | 149 Part | Private | Wet | 0.0070000(Hectare ) | 0.0070000 |
| 3 | 298 Part | Private | Dry | 0.0065000(Hectare ) | 0.0065000 |

**Village: Gagode Khurd**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 409/1 Part | Private | Dry | 0.0485000(Hectare ) | 0.0485000 |
| 2 | 417 Part | Government | Dry | 0.0025000(Hectare ) | 0.0025000 |
| 3 | 419 Part | Private | Dry | 0.0880000(Hectare ) | 0.0880000 |

**Village: Karambeli Chhattishi**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 53/1 TO5/21 | Private | Dry | 0.0018000(Hectare ) | 0.0018000 |
| 2 | 53/1TO5/5 | Private | Dry | 0.0625000(Hectare ) | 0.0625000 |
| 3 | 54/1 TO5/12 | Private | Dry | 0.0560000(Hectare ) | 0.0560000 |
| 4 | 54/1 TO5/13 | Private | Dry | 0.0550000(Hectare ) | 0.0550000 |
| 5 | 54/1 TO5/14 | Private | Dry | 0.0780000(Hectare ) | 0.0780000 |
| 6 | 78 Part | Government | Dry | 0.0340000(Hectare ) | 0.0340000 |
| 7 | 88 Part | Government | Dry | 0.0895000(Hectare ) | 0.0895000 |
| 8 | KHAN | Government | Dry | 0.0660000(Hectare ) | 0.0660000 |
| | | | Total | 1.7501 | 1.7501 |

[F. No. RW/NH-12014-150/2O17-MAH-Zone IV/3A]

RAJESH GUPTA, Director

## जाहीर सूचना

सर्व हितसंबंधित व्यक्तिना कळविण्यात येते की, पेण–खोपाली राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ D चे रुंदीकरण करण्यासाठी पेण तालुक्यातील मौजे आंबेघर, धावटे, गागोदे बुद्रुक, गागोदे खुर्द, करंबेली छत्तीशी या गावातील जमिनी संपादीत होत आहेत. त्याबाबत राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३ A अधिसूचना मराठी व इंग्रजी मध्ये भारत राजपत्रात दिनांक. २३ ऑगस्ट २०२२ रोजी प्रसिध्द झालेली आहे. या अधिसूचनेवर हरकती असल्यास दि. ०६/१०/२०२२ पर्यंत सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पेण विभाग पेण यांचे कार्यालयात दाखल कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

स्थळ :– पेण
दिनांक :– ०८/०९/२०२२

सही/–
( विठ्ठल इनामदार )
सक्षम प्राधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी पेण
उपविभाग पेण

क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/११२/१५०८/२०२२

